# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १३ मार्च, २०१८ / फाल्गुन २२, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**<br>**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**<br>**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७६**

---

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), औरंगाबाद येथील रिक्त पदे भरुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * ३८७३१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) औरंगाबाद येथील वर्ग-१ ते वर्ग-४ ची ६३० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी विविध विभागांची पुनर्रचना व नव्या सोईसुविधाकरीता रुपये १ कोटी ६० लक्षाचे प्रस्ताव घाटी प्रशासनाने संचालनालयाकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औषध व वैद्यकीय साहित्य पुरवठादार यांचे रुपये ६ कोटीचे देयक थकीत असल्याने पुरवठादार औषध व साहित्य यांचा वेळेवर पुरवठा करीत नाही, तसेच, घाटीतील शवगृहाची अवस्था अत्यंत जुनाट असून त्यासाठी रुपये ५ कोटींची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मनुष्यबळ व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालय, औरंगाबाद येथील वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

औषधे व साहित्य यांची थकीत देयके संस्थेच्या स्वीय प्रपंची खात्यातून अदा करण्यास संस्थेस परवानगी देण्यात आली आहे. तसेच संस्थेच्या शवचिकित्सा इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुरबाड तालुक्यात (जि.ठाणे) पंचायत समितीच्या लघुपाटबंधारे विभागामार्फत करण्यात आलेल्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * ३८९३१ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड तालुक्यात (जि.ठाणे) पंचायत समितीच्या लघुपाटबंधारे विभागामार्फत दरवर्षी त्याच-त्याच के.टी.बंधारे तलावाची संरक्षण भिंतीची कामे दाखवून उपअभियंता व शाखा अभियंता, मुरबाड यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही. मुरबाड तालुक्यात (जि.ठाणे) पंचायत समितीच्या लघुपाटबंधारे विभागामार्फत सन २०१४-१५ ते सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात के.टी.बंधारे तलावाची संरक्षण भिंतीची कामे मंजूर करण्यात आलेली नाहीत.

सन २०१४-१५ पूर्वीची तीन कामे अपूर्ण होती. ती कामे सद्य:स्थितीत पूर्ण करण्यात आलेली असून बांधण्यात आलेल्या संरक्षक भिंती सुस्थितीत व उपयोगात आहेत. या झालेल्या कामांवर पुन्हा पुन्हा त्याच बाबींसाठी खर्च झालेला नाही. त्यामुळे त्याच त्याच कामांवर खर्च झाल्याची अथवा गैरव्यवहार केल्याची बाब नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय रुग्णालयांतील वैद्यकीय सेवांचे दर शासनाने वाढविल्याबाबत

**(३) * ३८०७१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांतील वैद्यकीय सेवा उदा. मधुमेह, कर्करोग, पोटाचे विकार, हृदयरोग, मेंदू-मुत्रपिंड विकार, मज्जातंतू, नेत्रविकार तसेच उपचार शस्त्रक्रियेसाठी लागणारी औषधे इत्यादी सेवांचे दर वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये विभागाने वाढविले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील २३ महाविद्यालयातील उपचार व औषधोपचारात खासगी रुग्णालयांच्या धर्तीवर हजारो रुपयांचे शुल्क दरवाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सेवांच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य आणि गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवेपासून वंचित रहावे लागणार असल्याने सदर सेवांचा लाभ अत्यंत दुर्बल घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी शासनाने दरवाढीमध्ये फेरविचार करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोंढर ते चिवेली बंदर (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) रस्त्याच्या कामाबाबत

**(४) * ३८७६३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढर ते चिवेली बंदर (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या ११ कि.मी. लांबीच्या रस्त्यांपैकी केवळ ३.०० ते ४.५० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेतून करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये सदर रस्त्यांच्या ०.०० ते ११.०० कि.मी. लांबीमध्ये काम करण्याचे शासनाने प्रस्तावित केले असल्याचे मा.राज्यमंत्री, ग्रामविकास यांनी लोकप्रतिनिधींना लेखी स्वरुपात कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे कामास सुरुवात करण्यात आली नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सदर रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

३.०० ते ४.५० कि.मी. या लांबीमध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून फक्त डांबरीकरणाने नुतनीकरण केले आहे.

(२) मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी लोकप्रतिनिधींना लेखी स्वरुपात कळविल्याचे आढळून येत नाही.

(३), (४) व (५) माजरे कोंढर चिवेली या १०.२० कि.मी. लांबीच्या रस्त्याला रुपये ६६४.१६ लक्ष इतक्या रक्कमेची शासन निर्णय दिनांक ०८/०२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## राज्य कामगार विमा रुग्णालय, कोल्हापूर येथे कामगारांसाठी असणारी आरोग्य सेवा तसेच मेडिक्लेम योजना सुरु करण्याबाबत

**(५) * ३७६६० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गेली ३ वर्षे बांधकाम कामगारांसाठी महत्वाची असणारी मेडिक्लेम योजना तसेच कोल्हापूर ईएसआय रुग्णालयाची कामगारांसाठी असणारी आरोग्य सेवा बंद केल्यामुळे त्यांच्या व कुटुंबाच्या आजारपणाचा खर्च करणे या कामगारांना खूप अडचणीचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजना पुन्हा सुरु करण्याची मागणी सर्व श्रमिक संघ, मेकॅनिकल अॅण्ड इंजिनिअर कामगार युनियन व मेनन अॅण्ड मेनन कामगार कर्मचारी संघटना यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर, सांगली तसेच इतर जिल्हयात शासनाने कामगारांसाठी ईएसआय रुग्णालय सुरु केले परंतु अद्यापि तेथील कामगारांना सुविधा मिळत नसल्याने हजारो कामगारांच्या वेतनातून पैसे कपात केल्याचे तसेच कामगार व त्यांच्या कुटुंबियांना लाखो रुपये खर्च करुन महागडया रुग्णालयामध्ये उपचार घ्यावे लागत असल्याने कामगार कर्जबाजारी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाने दिनांक २६/१२/२०१७ रोजी शाखा कार्यालय राज्य कामगार विमा महामंडळ कोल्हापूर कार्यालयावर मोर्चा काढून सामूहिक निवेदन सादर केले आहे.

(३) हे खरे नाही.

कोल्हापूर व सांगली या दोन जिल्हयातील जुन्या क्षेत्राकरीता Secondary medical care करीता टाय-अप केलेल्या ०४ खाजगी रुग्णालयांव्यतिरिक्त उर्वरित संपूर्ण क्षेत्रातील विमाधारकांना Secondary medical care चे उपचार पुरविता यावे याकरीता एकूण ३९ खाजगी रुग्णालयांशी राज्य कामगार विमा महामंडळामार्फत टाय-अप करण्यात आले आहे.

या व्यतिरिक्त आपत्कालीन परिस्थितीत विमा रुग्णाने स्वखर्चाने इतर खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास राज्य कामगार विमा महामंडळामार्फत झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते.

(४) होय.

राज्य कामगार विमा रुग्णालय कोल्हापूर येथील सुविधांबाबत मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कामगार विमा महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत दिनांक ०७/१२/२०१७ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये राज्य कामगार विमा महामंडळाने मार्च, २०१८ पर्यंत सदर रुग्णालयातील बाहयरुग्ण विभाग सुरु करावा तसेच आंतररुग्ण सेवा त्वरीत सुरु करता यावी याकरीता विशेष दुरुस्तींच्या कामासाठी व पदांच्या मान्यतेकरीता मुख्यालयाशी पाठपुरावा करावा असे राज्य कामगार विमा महामंडळास निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना समितीवरील अशासकीय अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या रद्द केल्याबाबत

**(६) * ३८९२८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना समितीवरील अशासकीय अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या शासनाने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनुसूचित जातीसाठी राबविण्यात येत असलेल्या दलित वस्ती सुधार योजनेच्या धर्तीवर उक्त योजना राबविण्यात येत असताना या समितीवर अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याचे कारण काय आहे,

(३) असल्यास, सदर नेमणुका रद्द केल्यामुळे जिल्हास्तरावर या योजनेत गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) सदर योजनेच्या अमंलबजावणीसाठी शासन निर्णय दिनांक ३०/०१/२०१८ अन्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किल्ले रायगडावर पर्यटकांची गैरसोय होत असल्याबाबत

**(७) * ३८६९२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडावर विद्यार्थ्यांच्या सहली तसेच देशभरातून पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किल्ले रायगडावर व चित्तदरवाजा परिसरात पाणीटंचाई, स्वच्छतागृहांचा अभाव, वाहनतळ नसल्याने सतत होणारी वाहतुक कोंडी या सुविधांचा अभाव असल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड गावात सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधलेल्या धर्मशाळेची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.
(२) रायगड किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाने पर्यटकांकरिता मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचे कळविले आहे.
(३) व (४) अंशतः खरे असून, मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरण व भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग यांच्या समन्वयाने करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात उर्दू माध्यमाच्या अंगणवाड्या सुरु करण्याबाबत

**(८) * ३८०६३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्यांक विशेषतः मुस्लिम समाजात उर्दू भाषा मातृभाषा म्हणून बोलली जाते, यामुळे मातृभाषेत शिक्षण घेता यावे यादृष्टीने राज्यात उर्दू माध्यमाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा चालविल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्यांक समाजातील बालकांना मातृभाषेत आणि घरातील बोली भाषेत लहान वयापासून शिक्षण मिळावे तसेच त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी राज्यात उर्दू माध्यमाच्या अंगणवाड्या सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात उर्दू माध्यमाच्या अंगणवाड्या सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा या विभागाकडून चालविण्यात येत नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) एकात्मिक बाल विकास सेवायोजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१२/प्र.क.४२९/का-६ दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार ज्या अंगणवाडी/मिनी अंगणवाडी केंद्राकरिता सेविकेची/मदतनीसची/मिनी अंगणवाडी सेविकेची नियुक्ती करावयाची आहे अशा अंगणवाडीमध्ये ५० % पेक्षा जास्त मुले मराठी भाषेव्यतिरिक्त इतर भाषा (उदा. उर्दू, हिंदी, माडिया, गोंड, कोकणी, पावरी, कन्नड, तेलगू, भिल्लोरी, बंजारा वगैरे यापैकी एक भाषा) बोलणारी असतील तर अशा अंगणवाडीमध्ये सेविका/मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका यांच्या पदावर येथून पुढे सदर भाषेचे ज्ञान असलेल्यांची (लिहीता व वाचता येणे) सेविका/ मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविका म्हणून नेमणूक त्या अंगणवाडी/मिनी अंगणवाडी केंद्रावर करण्यात यावी. त्यांना मराठीचे ज्ञान असणे देखील जरुरी असेल अशी नेमणूक करताना अशा उमेदवारांचे अर्ज भरतीसाठी स्विकारण्यात यावेत अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार अंगणवाडी सेविका/ मदतनीस/मिनी अंगणवाडी सेविकाची नियुक्ती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेष घटक योजनेंतर्गत जवाहर विहिरीबाबत

**(९) * ३८२८६ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती, जमातीच्या लाभार्थ्यांना विशेष घटक योजनेंतर्गत घेतलेल्या रोजगार हमी धडक विहिरी/जवाहर विहिरीच्या बांधकामासाठी शासनाकडून रुपये २ ते ३ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत बांधकाम साहित्यांचे वाढलेले दर (वाळू, विटा, रेती व मजुरी इत्यादी) यामुळे कंत्राटदार जुन्या D.S.R. नुसार काम करण्यास तयार होत नसल्याने विहिरींची कामे विहित कालमर्यादेत पूर्ण न होता अपूर्ण राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विहिरीच्या बांधकामासाठी विशेष घटक योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय हे खरे आहे.

जवाहर/धडक सिंचन विहिर या अनुदान तत्वावरील योजनेंतर्गत नविन विहीर बांधण्यासाठी रुपये २,५०,०००/- इतके अनुदान देण्यात येते.

(२) हे खरे नाही. या योजनेंतर्गत सुधारीत नविन दर वापरुन विहिरीचे अंदाजपत्रके तयार करण्यात येतात. त्यामुळे विहीत केलेल्या अनुदानाच्या मर्यादेत काम करण्यास क्षेत्रियस्तरावर अडचणी येत नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इगतपुरी व त्र्यंबकेश्वर येथील पर्यटन स्थळांचा विकास करणेबाबत

**(१०) * ३७८६४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर हे संपूर्ण भारतवर्षासाठी धर्म आणि संस्कृतीचे आद्यपीठ असून कुंभमेळ्याच्या माध्यमातून जगात स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या त्र्यंबकेश्वर येथील धार्मिक स्थळांच्या विकासाबरोबरच

त्र्यंबकेश्वरच्या सर्वांगिण विकासासाठी स्वतंत्र बैठक घेण्याचे सुतोवाच मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास त्र्यंबकेश्वर येथे केले, हे खरे आहे काय,

(२) श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर या पवित्रनगरीचे पर्यटन स्थळात रुपांतर करण्याचेही शासनस्तरावर प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा, भाविक व पर्यटकांची संख्या वाढावी यासाठी सुविधा निर्माण करणे, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर शहरांचे धार्मिक व पर्यटनाचेदृष्टीने असलेले महत्व विचारात घेता इगतपुरी व त्र्यंबकेश्वर येथील पर्यटन स्थळांचा विकास करणेबाबत स्थानिकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकाससंदर्भात, इगतपुरी व त्र्यंबकेश्वर शहराचे पर्यटन विकासासाठी अतिरिक्त निधी मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय.

(२) केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने प्रसाद योजनेंतर्गत त्र्यंबकेश्वरच्या रुपये ३७.८० कोटीच्या विकास कामांना मंजुरी दिलेली आहे.

(३) होय.

(४) व (५) प्रश्न भाग (२) येथील उत्तरात नमूद केल्याप्रमाणे केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने प्रसाद योजनेंतर्गत त्र्यंबकेश्वरच्या रुपये ३७.८० कोटीच्या कामांना मंजुरी दिलेली आहे. तसेच इगतपुरी तालुक्यातील विविध कामांसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना व जिल्हा वार्षिक योजनेतून वेळोवेळी निधी मंजूर केला आहे.

-----------------

## नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील परिचरांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) * ३७९७८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, श्री.प्रकाश गजभिये, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३१०१२ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने मेडिकल रुग्ण सेवेसाठी कर्मचाऱ्यांचे आऊटसोर्सिंग करुन लाखो रुपये खर्च करीत असतानाही रुग्णांच्या नातेवाईकांना स्ट्रेचर, व्हीलचेअर ओढणे, ऑक्सिजन सिलेंडरसाठी धावाधाव करण्याची वेळ येत आहे तसेच अनेक वर्षापासून परिचरांची रिक्त पदे भरण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाकरिता अभिजित इंटेलिजेंस ॲण्ड लेबर सप्लायर या कंपनीकडून घेतलेल्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा अनुभव नसून त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी कोणतीही सक्षम यंत्रणा मेडिकलमध्ये नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेडिकलमधील अल्प मनुष्यबळ तसेच कंपनीच्या अनुभवी कर्मचाऱ्यांमुळे रुग्ण, रुग्णांचे नातेवाईक तसेच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कंपनीला दिलेले कंत्राट तात्काळ रद्द करुन रुग्णालयातील रिक्त असलेली सर्व पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साक्री तालुक्यामधील (जि.धुळे) तापी बुराई उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(१२) * ३८५१४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२९५३ ला दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री तालुक्यामधील (जि.धुळे) तापी बुराई उपसा सिंचन योजनेचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार तालुक्यातील कायमस्वरुपी दुष्काळी गावातून ही योजना जाणार असून अवर्षणग्रस्त भागातील पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने उक्त योजना त्वरीत कार्यान्वित करण्यात यावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजना त्वरीत कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) होय.

(३) सदर उपसा योजनेत ४ टप्प्यांचा समावेश असून उर्ध्वगामी नलिका व पंपगृह यांचा अंतर्भाव असलेली “क” नमुन्यातील निविदा सन २००० मध्ये निश्चित करण्यात आली आहे. योजनेच्या घटक भागांची संकल्पने अंतिम झाली आहेत. टप्पा १ मधील उर्ध्वगामी नलिकेचे काम ०२/२०१२ मध्ये प्रत्यक्ष सुरु करण्यात आले असून अंतिम टप्प्यात आहे. आवश्यक ४.३३ हे. वन जमीन संपादनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे. तसेच योजनेच्या टप्पा क्र.१ मधील निंभेल साठवण तलावासाठी खाजगी वाटाघाटीने जमीन संपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर योजना निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी नॅशनल पार्क येथील वन विभागाच्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(१३) * ३८८४३ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी नॅशनल पार्क येथील वन विभागात मागील २२ वर्षापासून श्री.विजय पद्माकर पाटील जमीन कक्ष विभागात लिपीक लेखापाल या पदावर कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, संबंधित लिपीक आणि स्थानिक गुंड विजय मारवाडी यांनी संगनमताने वन विभागाच्या जागेवर कब्जा करुन त्यावर अनधिकृत बांधकाम करुन विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) श्री.विजय पदमाकर पाटील हे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथे दिनांक ०४/१०/१९९५ ते दिनांक २६/१०/२०१० या कालावधीत लिपीक म्हणून तर दिनांक २७/१०/२०१० पासून लेखापाल म्हणून जमीन कक्षामध्ये कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केसलवाडा (ता.पवनी, जि.भंडारा) अंगणवाडीतील आर.ओ.शुध्द पाणी यंत्रप्रणाली निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(१४) * ३९०८८ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केसलवाडा (ता.पवनी, जि.भंडारा) गट ग्रामपंचायतीने अंगणवाडीत लावण्याकरीता रुपये ८१ हजार किंमतीचे आर.ओ.शुध्द पाणी यंत्र खरेदी केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आर.ओ.शुध्द पाणी यंत्र निकृष्ट दर्जाचे असून त्या ठिकाणी विदयुत पुरवठाही देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय निधीचा अपव्यय करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अंगणवाडीमध्ये विद्युत पुरवठा हा शाळेमधून देण्यात आलेला असून आर.ओ.शुध्द पाणी यंत्रप्रणाली सुरु आहे.

(३) केसलवाडा गट ग्रामपंचायतीमध्ये आर.ओ. शुध्द पाणी यंत्रणा प्रणाली खरेदी नियमाप्रमाणे नाही. १४ व्या वित्त आयोगाच्या निधींचा दुरुपयोग करुन जास्त रक्कम देवून साहित्य खरेदीमध्ये अपहार झाला असल्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांनी चौकशी अहवाल सादर केला असून तद्नुषंगाने संबंधित श्री.डी. एच. भुजबळ, तत्कालिन सचिव, ग्रामपंचायत केसलवाडा, पंचायत समिती, पवनी यांनी कर्तव्यात कसूर केल्याने त्यांना मु.का.अ.,जि.प., भंडारा यांच्या दिनांक २२/०२/२०१८ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील वृक्ष लागवडीबाबत

**(१५) * ३८४७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५४३४ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लागवड करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीपैकी बहुतांशी लागवड केवळ कागदोपत्रीच झालेली असल्याने त्याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्ष लागवडीची सत्यता तपासण्यासाठी औरंगाबाद येथील कार्यालय यांच्यास्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) मुख्य वन सरंक्षक प्रादेशिक औरंगाबाद कार्यालयाकडून विभागीय वन अधिकारी (नियोजन), औरंगाबाद यांना वृक्ष लागवडीची सत्यता तपासण्यासाठी चौकशी करणेबाबत आदेश देण्यात आले होते. त्यानुसार विभागीय वन अधिकारी (नियोजन) औरंगाबाद यांनी सदर काम मोठ्या प्रमाणावर असल्याने ६ तपासणी पथकांची नियुक्ती केली होती. सदर पथकांनी सन २०१७ च्या पावसाळयात परभणी प्रादेशिक वन विभागाच्या १७ रोपवन स्थळे तसेच सामाजिक वनीकरण विभागाच्या २३ ठिकाणी रस्ता दुतर्फा व २ ठिकाणी गट लागवड असे एकूण २५ कामांची माहे डिसेंबर, २०१७ मध्ये तपासणी केली आहे. सदर तपासणीच्या अनुषंगाने दोषी आढळलेल्या ६ कर्मचारी/ अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी दोषारोपपत्रे बजावण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खोरनिनको (ता.लांजा, जि.रत्नागिरी) गावातील धरणाच्या कालव्याचे काम शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सुरु केल्याबाबत

**(१६) * ३८३३४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोरनिनको (ता.लांजा, जि.रत्नागिरी) गावातील मुचकुंदी नदीवर बांधण्यात आलेल्या धरणाच्या कालव्याचे काम शेतकऱ्यांना विश्वासात न घेता व भूसंपादनाचा मोबदला न देता सुरु करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१७ रोजी ग्रामपंचायत खोरनिनको व दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी ग्रामपंचायत प्रभानवली यांच्या सभा जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होवून ग्रामस्थांसमोर मोजणी करुन भूसंपादन करुन मालकांना मोबदला देण्यात यावा तोपर्यंत कालव्याचे कोणत्याही प्रकारचे बांधकाम कंत्राटदाराने सुरु करु नये असा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाचे उल्लंघन करुन अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमत करुन कामाच्या निविदा काढून काम सुरु केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.

मुचकुंदी नदीवर बांधण्यात आलेल्या धरणाच्या कालव्यांची कामे अद्याप सुरू करण्यात आलेली नाहीत. मात्र कालव्याच्या सुरूवातीच्या भागातील जलसेतूचे सुरू करण्यात आलेल्या कामापैकी काही काम खाजगी जमिनीत असून ५०% पेक्षा जास्त शेतकऱ्यांची लेखी संमती घेवून सदर

जमिनीत काम सुरु करण्यात आले आहे. तसेच खाजगी वाटाघाटीने जमीन थेट खरेदी करुन घेण्यासाठी भूसंपादनचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

(२) होय.

शेतकऱ्यांना मोबदला अदा होईपर्यंत डाव्या कालव्याचे १ ते ५ किलोमीटरचे कोणत्याही प्रकारचे बांधकाम कंत्राटदाराने सुरु करु नये, असा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. त्यानुसार १ ते ५ किलोमीटरमध्ये कालव्याचे कोणतेही काम सुरु केले नाही.

(३) नाही.

कालव्याच्या १ ते ५ किलोमीटरचा भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केल्यामुळे सदर कामाच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. मात्र कालव्याचे काम अद्याप सुरू करण्यात आले नाही. सदर काम शेतकऱ्यांना मोबदला अदा केल्यावरच सुरू करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्लॅन, नॉन प्लॅनचा खर्च अनिवार्य खर्चात समावेश करण्याबाबत

**(१७) * ३८९६५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्लॅन, नॉन प्लॅन अशी विगतवारी न करता प्लॅनमधील खर्च अनिवार्य खर्चात समोवश करण्याबाबत वित्त विभागाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने प्लॅनमधील शिक्षकांच्या वेतनाचा खर्च अनिवार्य खर्चात समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) केंद्र शासनाच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याच्या निर्णय दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(२) सन २०१७-१८ पूर्वी योजनांतर्गत असलेल्या शिक्षकांच्या वेतनावरील खर्चाच्या योजना आता अनिवार्य खर्चात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.माधवराव चितळे यांच्या समितीने सादर केलेल्या शिफारशींबाबत

**(१८) * ३७७३० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २०३२१ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जेष्ठ जलतज्ञ डॉ.माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने जलसंपदा विभागासाठी स्वतंत्र नियमावली असावी व इतर बाबींमध्ये सुधारणा करावी अशा शिफारशी असणारा अहवाल माहे मार्च, २०१४ मध्ये शासनास सदर केलेला असून सदर अहवालानुसार विचार करण्यासाठी निवृत्त कार्यकारी संचालक श्री.एस.एन.सहस्त्रबुध्दे यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली व काही दिवसात त्यांच्याऐवजी निवृत्त कार्यकारी सचिव ए.पी.भावे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली व सदर समितीने नोव्हेंबर, २०१६ मध्ये जलसंपदा विभागाच्या सचिवांना अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ. माधवराव चितळे समितीने सादर केलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यावर ए.पी.भावे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) उक्त अहवालावर कार्यवाही प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत, तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) <u>डॉ.माधवराव चितळे समितीने सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप</u> :-

सिंचनविषयक विशेष चौकशी अहवालाच्या खंड-१ मधील पृष्ठ ५२३ वर समितीने खालील प्रमाणे नमूद केले आहे.

जलसंपदा विभागांतर्गत असलेल्या कामाचे स्वरुप, कामाची व्याप्ती, प्रकल्पाच्या कामामध्ये तसेच उद्दिष्टामध्ये असलेल्या विविधांगी बाजू, सार्वजनिक बांधकाम विभागातील कामापेक्षा जलसंपदा विभागातील कामातील वेगळेपणा, कार्यपध्दतीमधील बदल, इत्यादी बाबींचा विचार करता जलसंपदा विभागातील कामासाठी स्वतंत्र नियम पुस्तिका तयार करणे अत्यावश्यक आहे. एकूणच जलसंपदा विभागाचा स्वतंत्र विभाग म्हणून कार्यरत राहण्याचा बराच मोठा कालावधी झाल्यामुळे जलसंपदा विभागाची स्वतंत्र नियम पुस्तिका तयार करण्याची गरज आहे.

<u>श्री.ए.पी. भावे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप</u> :-

प्रस्तुत नियमावली तयार करतांना विद्यमान महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीचा व उपलब्ध शासन आदेशाचा समितीने अभ्यास केला असून त्यामधील काही तरतूदींशी समिती सहमत नसल्याने तर काही तरतूद सद्य:स्थितीमध्ये लागू नसल्याने समितीने आवश्यक वाटलेले बदल केले आहेत.

जलसंपदा विभागाकडील कामाच्या स्वरुपात झालेले बदल, नवनविन कार्यपध्दती, महामंडळ स्थापनेनंतर शासनस्तरावरुन निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रके, बदलेले तांत्रिक व माहिती तंत्रज्ञान, संगणक वापरामुळे झालेले कार्यपध्दतीतील बदल, प्रकल्प संकल्पन, प्रकल्पांचे कार्यान्वयन, तांत्रिक परिक्षण, सिंचन व्यवस्थापन, महामंडळाची कार्यपध्दती, जलसंपदा विभागांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांची कर्तव्ये, जबाबदारी व अधिकार तसेच सिंचन प्रकल्प सिंचन व्यवस्थापनास हस्तातंरण करण्याची कार्यपध्दती इत्यादी बाबींचा सर्वकष आढावा घेऊन नियमावलीत समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रस्तावित नियमावलीवर नियोजन व वित्त विभाग तसेच विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून त्यानुषंगाने नियमावली अंतिम करावयाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

-----------------

## राज्यातील बहुसंख्य नर्सिंग महाविद्यालयांनी स्वत:चे रुग्णालय उभारलेले नसल्याबाबत

**(१९) * ३९०८६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुसंख्य नर्सिंग महाविद्यालयांनी केवळ कागदावरच रुग्णालये उभारली असल्यामुळे नर्सिंगचे विद्यार्थी / विद्यार्थीनी प्रात्यक्षिकापासून वंचित रहात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १८ सप्टेंबर, २०१२ रोजी शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार प्रत्येक नर्सिंग महाविद्यालयाने तीन वर्षानंतर स्वतःचे १०० ते १५० खाटांचे रुग्णालय उभारणे अनिवार्य असल्याने त्या अटीच्या अधिन राहून किती शिक्षण संस्थांनी महाविद्यालये उभारली आहेत, नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) राज्यात आजमितीस आर.ए.एन.एम. आणि आय.जी.एन.एम. या नर्सिंग अभ्यासक्रमाची अनुक्रमे ४३७ आणि २४४ महाविद्यालये आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) राज्यातील प्रत्येक नर्सिंग महाविद्यालयाच्या स्थापनेपासून तीन वर्षानंतर विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी १०० ते १५० खाटांचे स्वतःचे रुग्णालय असणे बंधनकारक आहे, मात्र राज्यात ५०० नर्सिंग महाविद्यालयानी स्वतःचे रुग्णालय उभारलेच नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास नर्सिंग महाविद्यालयांना स्वतःचे रुग्णालय उभारण्याची सक्ती करणारा शासन निर्णय तातडीने रद्द करावा अशी मागणी संस्था चालकांनी मा.मुख्यमंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाच्या अटींचे उल्लंघन करुन उभारण्यात आलेल्या नर्सिंग महाविद्यालयांची परवानगी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदर शासन निर्णयानुसार तीन वर्षानंतर स्वत:चे रुग्णालय उभारणे आवश्यक आहे. नर्सिंग महाविद्यालयांची निकषानुसार परिणात्मक मुल्यांकन केले असता काही संस्थांच्याबाबतीत असे आढळून आले आहे. तथापि, अद्यापही नर्सिंग संस्थांची परिणामात्मक मुल्यांकन करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे. आर.ए.एन.एम. व आर.जी.एन.एम. नर्सिंग अभ्यासक्रमाची अनुक्रमे ४७७ आणि २४४ महाविद्यालये आहेत.

(४) होय, हे अंशत: खरे आहे.

(५) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर बाब संसद सदस्य (लोकसभा) मा.नाना पटोले यांनी त्यांचे दिनांक २०/११/२०१७ च्या सार्वजनिक आरोग्य विभागास प्राप्त पत्रानुसार मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली आहे.

(६) सद्य:स्थितीत १०० परिचर्या संस्थांचे परिणामात्मक मुल्यांकन करण्यात आले असून त्यापैकी त्रूटी आढलेल्या ५८ संस्थांना त्रुटीपूर्ततेबाबत संचालक (वै.शि.) यांचेमार्फत नोटीस बजावण्यात आली आहे. त्यापैकी समाधानकारक खुलासा प्राप्त न झालेल्या १३ संस्थांना ३ महिन्यामध्ये त्रुटीपूर्तता करण्याबाबत शासनामार्फत नोटीस देण्यात आली आहे. अद्याप कोणत्याही संस्थेची मान्यता रद्द करण्यात आलेली नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यात दोन वर्षापासून कुष्ठरुग्णांना औषधांसह व्यायामाचे साहित्य उपलब्ध झाले नसल्याबाबत

**(२०) * ३७८९० श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.मोहनराव कदम, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाकडून कुष्ठरोग नियंत्रणासाठी प्रत्येक वर्षी कोट्यवधीचा खर्च केला जात असतानाही नागपूर जिल्ह्यात सर्वाधिक कुष्ठरुग्ण आढळून आले असून तेथील कुष्ठरुग्णांना मागील दोन वर्षापासून आवश्यक औषधांसह व्यायामाचे साहित्यही उपलब्ध झाले नसून अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे निधी परत गेल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाला मागील एक वर्षापासून यासंदर्भातील जनजागृती साहित्यही मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कुष्ठरुग्णांना आवश्यक औषधे, व्यायाम साहित्य उपलब्ध करणे व जनजागृतीसाठी आवश्यक निधी देण्यासोबतच येथील जिल्हा कुष्ठरोग निर्मुलन समितीतील निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

नागपूर जिल्हा कुष्ठरुग्णांच्या संख्येमध्ये राज्यातील इतर जिल्हयांच्या तुलनेत ८ व्या क्रमांकावर आहे. कुष्ठरुग्णांना बहुविध औषधोपचार केंद्र शासनाकडून मोफत दिला जात असून जानेवारी, २०१८ अखेर शोधलेल्या ६५६ रुग्णांवर मोफत औषधोपचार सुरु करण्यात आलेला आहे. कुष्ठप्रतिक्रिया (लेप्रा रिॲक्शन) आलेल्या रुग्णांना आवश्यक औषधे प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी मोफत उपलब्ध आहेत. या औषधांचा मागील दोन वर्षापासून कोणताही तुटवडा झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

नागपूर जिल्हयास आरोग्य शिक्षण साहित्याकरिता रुपये ९८,०००/- निधी देण्यात आला असून, त्यामध्ये हस्तपत्रिका, डायग्नोस्टिक कार्डस, होर्डिंग्ज, फ्लेक्स बॅनर्स, इ. जनजागृती साहित्य वितरीत करण्यात आलेले आहे.

(३) निविदेतील तांत्रिक अटींची पूर्तता न झाल्याने सन २०१६-१७ मध्ये रुग्णोपयोगी साहित्याचा केंद्र शासनाचा निधी अखर्चित राहिला होता. सदर अखर्चित निधी परत न जाता सन २०१७-१८ या वर्षासाठी उपलब्ध झालेला आहे व त्यानुसार खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयामध्ये मृद आणि जलसंधारणाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२१) * ३९२१६ श्री.रामराव वडकुते, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयामध्ये मृद आणि जलसंधारणाची कामे (सन २०१६-१७) न करता अधिकारी आणि ठेकेदारांनी एकत्रितपणे रुपये चार कोटीचा गैरव्यवहार केल्याची माहिती कृषी आयुक्त यांनी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली असून जबाबदार दोषी अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे व त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नवीन पेन्शन योजनेतील रक्कम अदा करणेबाबत

**(२२) * ३७६९४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी नवीन अंशदान पेन्शन योजना लागू करण्यात आली असून सदर योजनेमध्ये कर्मचाऱ्यांची एक हप्ता कपात करून तेवढीच रक्कम शासनाकडून टाकण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास मार्च, २०१७ च्या अधिवेशनामध्ये खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या नवीन पेन्शन योजनेवरील व्याजाची तरतूद राज्य शासनाकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विजाभज विभागात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व्याजाची रक्कम जमा करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने विजाभज शाळेतील कर्मचाऱ्यांचे नवीन पेन्शन योजनेचे व्याज संबंधित कर्मचाऱ्याच्या खात्यामध्ये वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे :** (१) राज्यात सदरहू योजना दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पासून लागू करण्यात आली आहे. तथापि, कर्मचाऱ्यांच्या हप्त्याच्या हिश्श्या एवढी रक्कम शासनाकडून जमा केली गेली नाही.

(२) व (३) नाही. प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) काही ठिकाणी कर्मचाऱ्यांचे अंशदान जमा केले जाते व काही ठिकाणी जमा केले जात नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, राज्य शासनाच्या हिश्श्याची व त्यावरील व्याजाचे प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालय तसेच औरंगाबाद व नागपूर खंडपीठामध्ये विविध न्यायालयीन प्रकरणे दाखल झालेली आहेत. मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र. ३६९२/२०१७ मध्ये दिनांक १० जुलै, २०१७ रोजी अंतरिम आदेश दिले आहेत. यानुसार विजाभज आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांकडून या योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांच्या हप्त्याच्या हिश्श्या एवढी रक्कमेची कपात न करण्याचे निर्देश दिले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## कोकणातील आरोग्य यंत्रणेच्या दुरावस्थेबाबत

**(२३) * ३८६२६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय व कुटीर रुग्णालय या आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गावरील आरोग्य केंद्रांमध्ये अपघातग्रस्त रुग्ण दाखल होण्यासाठी आले तर साधी मलमपट्टी करण्याइतपत व्यवस्था या केंद्रांमध्ये नाही, तसेच कोकणातील रुग्णांना त्या त्या परिसरातील रुग्णालयात सुविधा नसल्याने कोल्हापूर सीपीआर रुग्णालय किंवा गोव्यातील बांबुळी येथील गोमेकॉ रुग्णालयावर अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोकणातील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करून तेथील आरोग्य केंद्रांमध्ये अद्यावत सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात मिळून वैद्यकीय अधिकाऱ्यांची ६४२ पदे मंजूर असून त्यापैकी ४३१ पदे भरलेली आहेत. रिक्त पदावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.

महामार्गावरील आरोग्य केंद्रात अपघातग्रस्त रूग्ण दाखल झाल्यास त्यांच्यावर उपचार केले जातात. गांभिर्य व आवश्यकतेनुसार रूग्णास पुढील उपचारासाठी ग्रामीण/उपजिल्हा/सामान्य रूग्णालयात अथवा जवळच्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये संदर्भित केले जाते.
(३) व (४) नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे राज्यस्तरावरून तसेच जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भरण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त तात्पुरती व्यवस्था म्हणून कंत्राटी तत्वावर वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात मनरेगाच्या कामांबाबत

**(२४) * ३७७८३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात १६५०२ जॉबकार्डची नोंदणी झाली असून १४४५ कामे ८,१०,१४४ मनुष्य दिनासाठी निर्माण करता येतील असे महसूल विभागाकडील रोजगार हमी योजना यंत्रणेकडून स्पष्ट करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) त्यातील ५० टक्के कामे करावयाची असतांना तालुक्यातील २७ गावातील ग्रामपंचायतींनी केवळ ८४ कामे काढून फक्त १०९८ मजुरांनाच कामे दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामातील अनुशेष भरून काढण्याची मुख्य जबाबदारी ग्रामपंचायतीची असताना त्यात दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच कृषी, वनविभाग, सामाजिक वनीकरण व सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केवळ २७ कामे काढून फक्त ५१० मजुरांनाच रोजगार उपलब्ध करून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोखाडा तालुक्यात मनरेगा कामाबाबत रोहयो यंत्रणेकडून होणाऱ्या विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करून संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

मोखाडा तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत एकूण १६९५१ जॉबकार्ड धारक असून ४७१५३ नोंदणीकृत मजुर आहेत. तसेच मोखाडा तालुक्यात एकूण २११५ कामे शेल्फवर असून सदर कामांवर ७,६६,५१९ इतकी मनुष्यदिन निर्मिती होऊ शकते.

(२) हे खरे नाही.

तालुक्यात सन २०१७-१८ या वर्षात एकूण १९२४ कामे हाती घेण्यात आली असून ७०३३ कुटुंबातील १४६२९ मजुरांना यंत्रणा व ग्रामपंचायतीकडून कामे पुरविण्यात आली आहेत. मजुरांना त्यांच्या कामाच्या मागणीप्रमाणे कामे उपलब्ध करुन देण्यात येतात.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

सन २०१७-१८ या वर्षात कृषी, वन, सामाजिक वनीकरण व सार्वजनिक बांधकाम या विभागांतर्गत ८५१ कामे काढून ९५३३१ इतके मनुष्यदिन निर्माण झालेले आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यामध्ये जोड बृहत आराखड्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांचा समावेश करणेबाबत

**(२५) * ३७६८२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ च्या जनगणनेवर आधारित जोड बृहत आराखड्यात नाशिक जिल्ह्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांचा समावेश करणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१६ व दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी तसेच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे स्थापन करण्याकरिता शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून नाशिक जिल्ह्यात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रे स्थापनेच्या मागण्या बृहत आराखड्यामध्ये निकषानुसार समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नेमलेल्या आरोग्य मित्रांनी रुग्णांकडून जादा रक्कम मागितल्याबाबत

**(२६) * ३८९१२ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविल्या जाणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य (जीवनदायी) योजनेवर निःशुल्क उपचार असताना देखील गरीबांकडून मोठ्या प्रमाणात अधिकचे पैसे वसूल केले जात असून बिल मंजूर करण्याकरीता २० हजार रूपयाची लाच घेतली असल्याचे तसेच सदर योजनेत दलालाचे मोठे जाळे तयार झाले असून त्यामुळे शासनाची रुपये १०० ते १५० कोटींची फसवणूक झाल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नेमलेल्या दोन आरोग्य मित्रांनी रुग्णांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ खाजगी रुग्णालयामार्फत मिळण्याकरिता रुग्णांकडून जादा रक्कम मागितल्या प्रकरणी लाचलुचपत खात्याने अटक केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारकर्त्याच्या आईला तक्रारकर्त्याने नागपुरातील एका खाजगी रुग्णालयात भरती केले होते, जिथे हृदयरोगाच्या शस्त्रक्रियेचा खर्च जास्त असल्यामुळे शासकीय योजनेचा लाभ केवळ नागपूर येथील शुअरटेक रुग्णालयातच उपलब्ध असल्याचे भासवून या दोन आरोग्यमित्रांनी रुग्णाला शुअरटेक खाजगी रुग्णालयात भरती करायला लावले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय योजनेचा लाभ मिळण्याकरिता सदर दोनही आरोग्य मित्रांनी तक्रारकर्त्याकडून अग्रिम रक्कम घेतली व उर्वरित रक्कम शस्त्रक्रियेनंतर घेत असताना लाचलुचपत खात्याने या दोघांना अटक केली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, आरोग्य मित्रांनी केवळ शुअरटेक रुग्णालयाचे नाव जाणूनबुजून सांगितल्या प्रकरणी हृदय शस्त्रक्रिया झालेल्या खाजगी रुग्णालयावर प्रतिबंधात्मक योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) राज्यात राबविल्या जाणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या मेडीट्रीना रूग्णालय, नागपूर येथील आरोग्य मित्र व इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथील डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना नि:शुल्क उपचार असताना देखील १० हजार रूपयाची लाच स्विकारताना लाचलुचपत खात्याने दिनांक २६/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करून अटक केली. सदर आरोग्य मित्र व डाटा एंन्ट्री ऑपरेटर यांच्या नियुक्त्या TPA -Third Party Administrator कडून करण्यात येतात. सदर योजनेत शासनाचे १०० ते १५० कोटी रूपयांची फसवणूक झाल्याची बाब वस्तुस्थितीदर्शक नाही.

(३) तक्रारदार यांच्या आई यांचेवर Angiography करण्यासाठी मेडीट्रीना रूग्णालय, नागपूर येथे दाखल करण्यात आले. तेथे हृदय रोगाच्या शस्त्रक्रियेचा खर्च जास्त असल्याने तेथील आरोग्यमित्राने रूग्णास योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या शुगरटेक या खासगी रूग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करण्याकरिता संदर्भीत केले व सदर रूग्णालयात रूग्णांवर योजनेंतर्गत मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

(४) मेडीट्रीना रूग्णालय, नागपूर येथील आरोग्य मित्र व इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय येथील डाटा एन्ट्री ऑपरेटर यांनी तक्रारकर्त्याकडून रुपये ५,०००/- अग्रिम रक्कम घेतली व उर्वरित रक्कम रुपये १०,०००/- मागत असताना दिनांक २६/१२/२०१७ रोजी लाचलुचपत खात्याने अटक केली.

(५) सदर प्रकरणी विमा कंपनीच्या विभागीय व्यवस्थापक यांनी चौकशी केलेली असून सदर लाचखोरीच्या प्रकरणाशी संबधित शुगरटेक रूग्णालयाचा प्रत्यक्ष सहभाग नसल्याचे विमा कंपनीस आढळून आले आहे. तसेच दिनांक ०१/०२/२०१८ पासून पॅरामाऊन्ट टिपीए ऐवजी एम डी इंडीया टिपीएकडे सदर जिल्ह्यातील काम सुपुर्द करण्यात आले आहे.

(६) सदर प्रकरणी विमा कंपनीने चौकशी केली आहे. तथापि, राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून उपसंचालक नागपूर परिमंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली असून सदर समितीमार्फत प्रस्तुत प्रकरणी स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येत आहे

-----------------

# राज्यातील शहरी भागातील गलिच्छ वस्तीतील कुपोषणाची स्थिती सुधारण्याबाबत

**(२७) * ३८७४१ श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर व मुंबई येथील झोपडपट्टीमधील दर दहा हजार मुलांमागे तीव्र कुपोषणाचे प्रमाण ४ ते ५ टक्के व मध्यम कुपोषणाचे प्रमाण ८ ते १० टक्के असल्याचे एका संघटनेच्या पाहणीत दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या बालकांची कुपोषणाची स्थिती अधिक गंभीर झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरी भागातील गलिच्छ वस्तीतील कुपोषणाची गंभीर दखल घेऊन शासनाने स्थिती सुधारण्याकरिता व कुपोषण निर्मुलनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कुपोषणाची स्थिती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची बालके तसेच किशोरवयीन मुली यांना घरपोच आहार (THR) व ३ वर्ष ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थी यांना गरम ताजा आहाराचा पुरवठा स्थानिक स्वयंसहाय्यता महिला बचतगट/महिला मंडळ तसेच महिला संस्था

यांचेमार्फत करण्यात येत आहे. तसेच आरोग्य विभागाच्या मदतीने बालकांचे लसीकरण करणे, आरोग्य तपासणी करणे, गरोदर व स्तनदा मातांना आरोग्य व पोषण शिक्षण देणे इत्यादी सेवा लाभार्थ्यांना पुरविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघरमधील सिडको येथील एका १० वर्षाच्या मुलाचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(२८) * ३८६०२ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघरमधील सिडको येथील एका १० वर्षाच्या मुलाचा उपचाराअभावी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर घटनेतील दोषींवर कारवाई करण्याबाबत व मृत्यू पावलेल्या मुलाच्या कुटुंबास आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.दीपक सावंत :** (१) व (२) मयत कु.दिलखुश मंडळ (वय वर्षे ९) या मुलास दिनांक २७/१२/२०१७ रोजी कुत्रा चावल्याने उपचारार्थ ग्रामीण रूग्णालय, पालघर येथे दाखल करण्यात आले होते. सदर मुलास त्याच दिवशी अँटीरेबीज व्हॅक्सीनचा डोस देण्यात आला होता व दुसरा डोस दिनांक ३०/१२/२०१७ रोजी देण्यात आला होता. तिसरा डोस दिनांक ०४/०१/२०१८ रोजी देणे अपेक्षित होते तथापि, मुलाच्या नातेवाईकांनी सदर मुलास दिनांक ०२/०१/२०१८ रोजी खाजगी डॉक्टरांकडे नेले होते. त्यावेळी सदर मुलामध्ये रेबीजची लक्षणे दिसून आल्यामुळे त्यांनी सदर मुलास उपचारार्थ मुंबईला नेण्याचा सल्ला दिला. तथापि, दिनांक ०२/०१/२०१८ रोजी मुंबईमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे १०८ रूग्णवाहिकेवरील BVG मार्फत

नियुक्त डॉ.रॉय यांनी सदर रूग्णास मुंबईला नेले नाही व त्यास बलसाड/ गुजरात येथे नेण्याबाबत सल्ला दिला. त्याप्रमाणे रूग्णास दिनांक ०३/०१/२०१८ रोजी सामान्य रूग्णालय, बलसाड येथे संदर्भित करण्यात आले. तथापि, उपचारादरम्यान रूग्णाचा मृत्यू झाला.

यासंदर्भात सदर १०८ रूग्णवाहिकेवरील नियुक्त डॉ.रॉय यांना BVG संस्थेने निलंबित केले आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित मयत मुलाच्या तीन नातेवाईकांवर अँटीरेबीजचे उपचार करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संवर्गनिहाय बिंदूनामावलीतील त्रुटी दूर करण्याबाबत

**(२९) * ३८१३३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षक आस्थापनेच्या संवर्गनिहाय बिंदूनामावलीत गोंधळ झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती आयुक्त कार्यालयात सादर केलेल्या बिंदूनामावलीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच बिंदूनामावलीतील त्रुटी दूर करुन निर्दोष यादी तयार करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) अकोला जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक सहायक शिक्षक संवर्गाची बिंदूनामावली आरक्षण अधिनियमातील तरतुदीनुसार तयार करण्यात येऊन सदर बिंदूनामावलीस सहाय्यक आयुक्त (मा. व क.), विभागीय आयुक्त

कार्यालय, अमरावती यांची मान्यता प्राप्त झालेली आहे. माध्यमिक शिक्षक संवर्गाची बिंदूनामावली प्रस्ताव तयार करुन सहाय्यक आयुक्त (मा. व क.), अमरावती यांना सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यात आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षकांची नियमबाह्य निवड केल्याबाबत

**(३०) * ३९२२३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यात जिल्हा परिषदेतर्फे सन २०१७ मध्ये शिक्षकांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करतांना नियमबाह्य निवड झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लांजा पंचायत समिती शिक्षण विभागाने शाळेत गैरहजर असलेल्या शिक्षकांची तसेच उसनवारी तत्वावर पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांची निवड केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गटशिक्षणाधिकारी यांनी सदर प्रस्ताव पाठवितांना प्रतिकूल शेरा दिलेला असतांना व स्थायी समितीने सुध्दा याविषयी आक्षेप घेतलेला असतांना पुरस्कार वितरीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदर्श काम करणाऱ्या शिक्षकांवर होत असलेल्या अन्यायाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

(४) स्थायी समितीमध्ये घेणेत आलेल्या आक्षेपानुसार लांजा गटाकडील तत्कालीन गटशिक्षणाधिकारी व विद्यमान गटशिक्षणाधिकारी यांना स्थायी समिती सदस्य यांचेसमोर बोलावून सदर शिक्षकाचे आदर्श शिक्षक पुरस्कार निवडीबाबत समक्ष चर्चा करुन स्थायी समितीमध्ये घेणेत आलेल्या आक्षेपाचे निराकरण करणेत आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रजपूतवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) आश्रमशाळा वसतिगृहातील विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(३१) * ३९५८२ श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रजपूतवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) आश्रमशाळेतील वसतिगृहात झोपण्याच्या जागेच्या वादावरुन दोन विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या हाणामारीत एकाचा मृत्यू झाल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) माध्यमिक आश्रमशाळा महात्मा ज्योतीराव फुले कनिष्ठ महाविद्यालय, रजपूतवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर या आश्रमशाळेत दिनांक १०/०१/२०१८ रोजी रात्री ०९.०० च्या सुमारास उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थी

कु.शंकर सावळाराम झोरे (इ.११वी विज्ञान) व कु.मनोज विनायक थोरात (इ.११वी कला) या विद्यार्थ्यांमध्ये झोपण्याच्या जागेवरुन हाणामारी होऊन त्यामध्ये कु. शंकर सावळाराम झोरे या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे.

कु. मनोज विनायक थोरात या विद्यार्थ्याविरुध्द करवीर पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे एफ.आय.आर. दाखल करण्यात आला असून त्यास अटक करुन पोलीस कस्टडी देण्यात आली आहे व पुढील तपास पोलीस विभागाकडून सुरु आहे. तसेच, सदरहू संस्थेचे अध्यक्ष/सचिव व संबंधित उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक यांना संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली असून संस्थेने वसतिगृह अधिक्षकास निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ओबीसीसाठी असलेली क्रिमिलेअरची मर्यादा वाढविण्याबाबत

**(३२) * ३९७५१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओबीसीसाठी असलेली क्रिमिलेअरची मर्यादा रुपये ६ लाखावरुन रुपये ८ लाख करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करुन त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

याबाबतचा शासन निर्णय दिनांक १६/१२/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

(२) व (३) सदरहू उत्पन्न मर्यादा ही राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यामधील प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी लागू करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कर्मचारी कपात करत असल्याबाबत

**(३३) * ३९७९१ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये ४० टक्के पदे रिक्त असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असुनही शासन कर्मचारी कपात करत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कर्मचारी कपात न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे,

सर्व जिल्हा परिषदेच्या सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा निर्णय शासनाने दिनांक २४/०८/२०१७ रोजी घेतला आहे. परंतु शासनाच्या वित्त विभागामार्फत जिल्हा परिषदेचा आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक २५ मे, २०१७ नुसार ३० % पदांमध्ये कपातीबाबत सूचना दिलेल्या आहेत. परंतु त्यानुषंगाने जिल्हा परिषदेमधील पदांची आवश्यकता विचारात घेऊन आकृतिबंध अंतिम करण्यात येईल.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३४) * ४००१७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २९६९३ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गोताडवाडी तसेच जिल्हा परिषद मराठी शाळा ते ग्रामदेवता मंदीर या अडीच कि.मी. अंतराच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थांनी संबंधितांकडे मागणी करुनही निधी उपलब्ध करण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) प्रश्नामध्ये एकूण तीन रस्त्यांचा समावेश होतो -

गोताडवाडी हे गाव ग्रा.मा.क्र. २११ वर सा.क्र. २/५०० मध्ये स्थित आहे.

तर जिल्हा परिषद मराठी शाळा व ग्रामदेवता मंदिर ग्रा.मा.क्र. २१२ वर सा.क्र. २/०० मध्ये स्थित आहे. ग्रामदेवता मंदिर जिल्हा परिषद मराठी शाळेपासून २०० मी. अंतरावरील योजनाबाहय रस्त्यावर स्थित आहे.

ग्रा.मा.२११ आणि ग्रा.मा.२१२ हे दोन्ही रस्ते इ.जि.मा.क्र.९२ च्या अनुक्रमे सा.क्र. १२/५०० व १३/०० वरुन सुरु होत असून गोताडवाडी ते जिल्हा परिषद शाळापर्यंतचे एकूण अंतर ५.०० कि.मी. आहे.

या तीनही रस्त्यांच्या प्रश्नाधीन साखळी क्रमांकातील लांबी डांबरी पृष्ठभागाची असून सदर रस्त्यांची कामे रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमातून उपलब्ध निधी व निकषानुसार टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील संगणक परिचालक यांना वेतन अदा करण्याबाबत

**(३५) * ४०१९३ श्रीमती स्मिता वाघ, श्री.हरिसिंग राठोड, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक २३८९५ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतींमध्ये काम करणाऱ्या हजारो संगणक परिचालकांना मागील ८ महिन्यापासून वेतन अदा करण्यात आले नसल्याने दिनांक १२ ऑक्टोबर, २०१७ पासून सर्व जिल्हा परिषदेसमोर संगणक परिचालकांनी उपोषण केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, यवतमाळ जिल्ह्यातील संगणक परिचालक संघटनेमार्फत मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आपले सरकार सेवा केंद्रामधील केंद्र चालकांच्या विविध मागण्यांसंदर्भात शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संग्राम प्रकल्पात काम केलेल्या संगणक परिचालकास आपले सरकार सेवा केंद्रामध्ये सामावून घेणे, माहे जानेवारी, २०१६ ते नोव्हेंबर, २०१६ पर्यंतचे मानधन देणे, माहे डिसेंबर, २०१६ पासून काम करीत असलेल्या संगणक परिचालकास पदावरून कमी न करणे व इतर मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) दिनांक १४/१०/२०१७ रोजी विविध मागण्यांबाबत शासनास प्राप्त झालेल्या निवेदनानुसार केंद्र चालकांच्या मागण्यांबाबत केंद्र चालकांचे प्रतिनिधी व सीएससी-एसपीव्ही चे प्रतिनिधी यांच्यासमवेत सचिवस्तरावर बैठक घेऊन केंद्र चालकांच्या अडीअडचणी त्वरीत सोडविण्याच्या सूचना सीएससी-एसपीव्ही यांना देण्यात आल्या आहेत. तसेच संगणक परिचालकांना जून, २०१७ पर्यंतचे वेतन देण्यात आले आहे. तसेच सुरु असलेले कामबंद आंदोलन स्थगित करुन दिनांक ०६/११/२०१७ पासून काम सुरु करत असल्याबाबत केंद्र चालकांच्या प्रतिनिधीने शासनास लेखी कळविले आहे.

तसेच, प्रश्न भाग-२ संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ तसेच सीएससी-एसपीव्ही यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पॅथॉलॉजी लॅबमध्ये रुग्णांकडून जास्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत

**(३६) * ४०३७२ श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४६८३ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पॅथॉलॉजी लॅबमध्ये रुग्णांकडून जास्त शुल्क आकारण्यात येत असल्यामुळे रुग्णांमध्ये असंतोष व संतापाची भावना पसरली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने रुग्णांची लूट करणाऱ्या पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही, शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण विभाग, दिनांक ०४/०७/२०१७ नुसार शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयातील मोफत वैद्यकीय सेवांसाठी (पॅथॉलॉजी लॅब चाचण्यांसह) लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. तथापि, शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण विभाग, दिनांक २०/११/२०१७ नुसार शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालयांशी संलग्नित रुग्णालयातील औषधोपचारासाठी व तपासणी सुविधांसाठी सुधारित रुग्णशुल्क आकारण्यात येत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पेट्रोल व डिझेल दर वाढीबाबत

**(३७) * ४०५९८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५६९० ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासन इंधनावर अधिभार लावत असल्यामुळे शेजारील कर्नाटक व गोवा या राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यात सर्वाधिक पेट्रोल व डिझेलचे दर असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा दर प्रतिबॅरेल ७० डॉलर झाल्याचे कारण पुढे करत शासकीय तेल कंपन्यांनी पेट्रोल-डिझेलच्या दरात पेट्रोल रुपये ८० तर डिझेल रुपये ६६ प्रतिलिटर तर मुंबईत पेट्रोलचा दर रुपये ७९.१५ व डिझेलचा रुपये ६५.९० प्रतिलिटर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या २ महिन्यात पेट्रोल डिझेलचे दर लिटरमागे रुपये ३.५० प्रमाणे वाढले असल्याने इंधन दरवाढीमुळे महागाईही अप्रत्यक्षपणे वाढून शासनाने इंधनावरील अधिभार रद्द करण्यासोबतच पेट्रोलियम पदार्थाचा जीएसटीमध्ये समावेश करावा, ही मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पेट्रोल व डिझेलचे दर नियंत्रित करण्याचेदृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) तेल कंपन्यांद्वारे विक्री होणाऱ्या पेट्रोल व डिझेलच्या किंमतीमध्ये प्रतिदिनी बदल होत असतो. महाराष्ट्राच्या शेजारील गुजरात, मध्यप्रदेश, तेलंगणा राज्यापेक्षा राज्यातील डिझेलची किंमत कमी आहे. कर्नाटक व गोवा या राज्यापेक्षा राज्यातील डिझेल व पेट्रोलची किंमत काही प्रमाणात अधिक आहे.
(२) शासकीय तेल कंपन्यांमार्फत विक्री होणाऱ्या पेट्रोल व डिझेलच्या किंमती आयात होणाऱ्या कच्च्या तेलाच्या किंमती त्याचप्रमाणे त्यावरील प्रक्रिया खर्च व इतर बाबींवर अवलंबून असून, विक्री किंमत ठरविण्याचे पूर्ण अधिकार तेल कंपन्यांना आहेत.
(३) पेट्रोलियम पदार्थांचा समावेश जीएसटी अंतर्गत करण्याबाबतची मागणी कार्यालयास प्राप्त झाली आहे.
(४) पेट्रोल व डिझेलचा समावेश जीएसटी अंतर्गत करण्याबाबतचा निर्णय वस्तू व सेवा कर परिषदेच्या कार्यक्षत्रात येत आहे. राज्य शासन वस्तू व सेवा कर प्रणालींतर्गत महसूलाची स्थिती विचारात घेवून पेट्रोल व डिझेलचा समावेश वस्तू व सेवा कर प्रणालीतील अंतर्भावाबाबत वस्तू व सेवा कर परिषदेस शिफारशीसंदर्भात निर्णय घेईल.
(५) लागू नाही.

-----------------

## माहूर शहरातील (जि.नांदेड) रामगड किल्ला परिसरातील जंगलात आग लागल्याबाबत

**(३८) * ४०६७५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहुर शहरातील (जि.नांदेड) वनपरिक्षेत्र कार्यालयालगत असलेल्या रामगड किल्ला परिसरातील जंगलाला लागलेल्या भीषण आगीत सागवान वृक्षासह अनेक औषधी वनस्पती जळून खाक झाले असून अनेक प्राणी होरपळले असल्याने वन विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जंगलात प्रचंड प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली असून कारवाईच्या भितीने ही चोरी लपविण्यासाठी अशाप्रकारे आग लावण्याच्या घटना येथे घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी भविष्यात कधी आग लागून साग व औषधी वनस्पती नष्ट होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक २८/०१/२०१८ रोजी नांदेड जिल्हयातील माहूर वनपरिक्षेत्रांतर्गत माहूर नियतक्षेत्रातील वन सर्व्हे नं.८४ चे कक्ष क्र.१ A/२ मधील किल्ला क्षेत्रात आग लागल्याचे निदर्शनास आले आहे. सदर आगीत १ ते १.५ हे. क्षेत्रातील पालापाचोळा व गवत जळाले असून वन्यजीवाची हानी झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) वनक्षेत्रात आग लागू नये यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात :-

१) नियतक्षेत्रात आग रक्षक (Fire Watchers) ठेवण्यात आले आहेत.

२) वन अधिकारी/कर्मचारी यांचेकडून नियमित गस्त केली जाते.

३) जाळ रेषा नियमितपणे घेण्यात येतात.

४) निरिक्षण मनोरे उभारण्यात येतात.

५) वनसंरक्षणासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समितीची मदत घेण्यात येते.

(४) व (५) माहूर नियतक्षेत्रातील आगी प्रकरणी भा.दं.वि. १९२७ अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द दिनांक २९/०१/२०१८ रोजी वनगुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. प्रकरणातील आरोपींचा शोध घेणे चालू आहे.

-----------------

## सीना नदीत (जि.सोलापूर) उजनी धरणाचे पाणी कालव्याव्दारे सोडणेबाबत

**(३९) * ४०६९२ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीत उजनी धरणाचे पाणी सोडलेले असले तरीही उत्तर तालुक्यांपर्यंत पाणी येण्यास वेळ लागत असल्यामुळे कालव्याव्दारे सीना नदीत पाणी सोडण्याकरीता नागरिकांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

मौजे तिऱ्हे येथील शेतकऱ्यांनी दिनांक १०/०१/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना निवेदन सादर केले आहे. सदरहू निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडून दिनांक १६/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांना प्राप्त झाली आहे.

(२) उजनी धरणातील सन २०१७-१८ मधील रब्बी हंगामाची कालवा सल्लागार समितीची बैठक मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १०/०१/२०१८ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. सदरहू बैठकीमध्ये रब्बी हंगाम सन २०१७-१८ मधील पाणी नियोजनास मान्यता देण्यात येऊन भीमा सीना जोड कालवा प्रकल्पांतर्गत झालेल्या

निर्णयाच्या अनुषंगाने कालव्यांच्या या आवर्तनाच्या वेळी दिनांक १९/०१/२०१८ पासून दिनांक ०२/०२/२०१८ पर्यंत सीना नदीमधील मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील ९ को.प.बंधाऱ्याकरीता एकूण १०.६९ द.ल.घ.मी. पाणी कुरुल व मोहोळ शाखा कालव्याच्या अतिवाहकातून सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील ग्रामीण रूग्णालयाच्या दुरवस्थेबाबत

**(४०) * ४०८६३ श्री.बाळाराम पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील ग्रामीण रूग्णालय हे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या इमारतीतच सुरू असून तेथे २५ कर्मचाऱ्यांपैकी केवळ १२ कर्मचारीच उपलब्ध आहेत, मोठी इमारत नसल्याने ३ अधिपरिचारीका (नर्स), एक डॉक्टर, एक लिपीक, वर्ग ४ ची ४ पदे व 'क्ष' किरण तज्ञ या पदाचे कर्मचारी उपलब्ध नसल्याने उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना ठाणे, शहापूर व खाजगी ठिकाणी उपचार करण्यासाठी जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रूग्णालयात ३० खाटा, बालरोग तज्ञ, एक्सरे मशीन, टॉयफाईड रक्त तपासणी व उर्वरित कर्मचारी उपलब्ध करून देण्यात यावेत तसेच शवविच्छेदन गृहात वीज, इतर सुविधा व पाणी टंचाई दूर करण्यात यावी अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी मागील दोन वर्षांपासून मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.मुख्यमंत्री, उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य सेवा, ठाणे आदींकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रूग्णालयाच्या दुरूस्तीचा तथा पुनर्बांधणीचा रुपये १२ कोटींचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून मागील ३ वर्षांपासून केवळ मुख्य वास्तुविशारदची स्वाक्षरी नसल्यामुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रूग्णालयाच्या दुरूस्ती तथा पुनर्बांधणीचे काम विनाविलंब हाती घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या इमारतीत कार्यरत आहे. हे खरे आहे. सध्याच्या इमारतीचे आकारमान विचारात घेऊन १५ पदाच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली असून त्यापैकी १४ पदे भरण्यात आली आहेत.

(२), (३) व (४) सदर ठिकाणी ग्रामीण रुग्णालयाच्या सुविधा देण्यासाठी सदर ग्रामीण रुग्णालयासाठी पुरेशी जागा उपलब्ध झाली असून इमारतीच्या अंदाजपत्रक व आराखडयाना मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे. इमारतीच्या वास्तु मांडणी व आराखडे (lay out plan) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून अद्याप अप्राप्त आहेत. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामनगर (ता.जि.जालना) येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(४१) * ३८७३० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना तालुक्यातील रामनगर हे मोठी बाजारपेठ असलेले गाव असून या गावाच्या परिसराला २० ते २५ गावे जोडली गेली असून रामनगर येथे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयास मान्यता मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, रामनगर येथे ग्रामीण रुग्णालय नसल्याने सामान्य जनतेला प्रवास भाडयाचा भुर्दंड सोसून जालना शहरात जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने ग्रामीण जनतेला वैद्यकीय सेवा मिळण्याच्यादृष्टीने रामनगर येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) रामनगर येथे ३० खाटांचे ग्रामीण रूग्णालय सुरू करण्यास दिनांक १७ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून, याठिकाणी दिनांक २४ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये इमारत बांधकामासाठी रूपये ४५०.०० लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर रूग्णालयाकरीता ४ एकर जमिनीचा ताबा दिनांक ०६/०६/२०१७ रोजी मिळाला असून, इमारत बांधकामासाठी, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारित अंदाजपत्रक तयार करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीमधील यशवंतनगर व वाकुडपाडा गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत

**(४२) * ३८८४५ श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३३५ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) नगरपंचायतीमधील यशवंतनगर व वाकुडपाडा या गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचे निवेदन अध्यक्ष, श्रमजीवी कामगार रयत संघटना यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रमगड नगरपंचायतीमधील यशवंतनगर व वाकुडपाडा या गावांमध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्याकरीता सदर गावांना नगरपंचायतीमधून वगळण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यशवंतनगर व वाकुडपाडा या गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

मा.श्री.विवेक पंडित, संस्थापक अध्यक्ष, श्रमजीवी कामगार रयत संघटना यांनी दिनांक ११/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पालघर जिल्ह्यातील विक्रमगड नगरपंचायती मधील यशवंतनगर व वाकुडपाडा या गावांची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतचे निवेदन सादर केले आहे.

(२) व (३) सद्य:स्थितीत विक्रमगड ग्रामपंचायतीचे यशवंतनगर व वाकुडपाडा या गावासह संपूर्ण क्षेत्राचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. याबाबत शासन राजपत्र दिनांक ७ मे, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे.

विक्रमगड नगरपंचायतीमधील यशवंतनगर व वाकुडपाडा या गावांमध्ये ग्रामपंचायत स्थापन करावयाची झाल्यास या गावांना विक्रमगड नगरपंचायतीमधून वगळणे आवश्यक आहे. नगरपंचायती मधून गावे वगळणेबाबतची कार्यवाही नगरविकास विभागाकडून होणे आवश्यक असल्याने सदरचा संदर्भ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासनपत्रान्वये नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आला आहे. त्याची प्रत संबंधितांना देण्यात आली आहे.

तसेच यासंदर्भात प्राप्त अन्य निवेदनांच्या अनुषंगानेही शासनपत्र दिनांक ८ जुलै, २०१६, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६, दिनांक २२ डिसेंबर, २०१६ व दिनांक २२ जानेवारी, २०१८ अन्वये नगरविकास विभागाकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी नगर विकास विभागाने जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून यशवंतनगर व वाकुडपाडा ही गावे विक्रमगड नगरपंचायतीमधून वगळण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल मागविण्यात आल्याचे दिनांक ०२ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सवते (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील मिळकतीच्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड केल्याबाबत

**(४३) * ३९९१९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सवते (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील मिळकत क्र. १८ च्या कागदपत्रांमध्ये सचिव, ग्रामपंचायत व पदाधिकाऱ्यांनी खाडाखोड करुन मूळ मालकांनी अतिक्रमण केल्याचे कारण देऊन त्यांचे राहते घर पाडण्याच्या नोटीसा दिल्या असल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळ दस्तऐवजात खाडाखोड करुन राहती घरे पाडण्याच्या नोटीस प्रकरणी मुळ घर मालकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे सादर केलेल्या विनंती अर्जावर तसेच दिनांक ११ मे, २०१५ रोजी आयोजित लोकशाही दिनाचे दिवशी मा.मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या अर्जानुसार मुळ दस्तऐवजात पूर्ववत सुधारणा करुन संबंधित ग्राम सचिवांविरुध्द कारवाई करण्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये आदेश देवूनही अद्याप कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार ग्रामपंचायतीने मुळ दस्तऐवजात खाडाखोडीच्या जागी पूर्ववत सुधारणा करुन सचिव, ग्रामपंचायत व पदाधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

ग्रामपंचायत सवते, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर येथील घरठाण पत्रकातील (मिळकत क्र. १८ नसून) मिळकत क्र. १८४ श्री.मधुकर तुकाराम शिंदे यांची आहे. ग्रामपंचायत सवते यांचेकडून दिनांक २४/१०/२०११ व दिनांक २२/११/२०११ च्या नोटीशीन्वये श्री.मधुकर तुकाराम शिंदे यांना घर पाडण्याची नोटीस दिलेली नसून घराशेजारील अतिक्रमित असलेली पिठाची गिरण (३ x १५ फूट) व जिना (५ x ८ फूट) काढून टाकणेबाबत नोटीस दिली आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक ११ मे, २०१५ रोजी मंत्रालयस्तरावरील लोकशाही दिनाच्या अनुषंगाने प्रधान सचिव यांनी सदर प्रकरणी सर्व अभिलेख मागवून घ्यावेत व ते तपासून विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने पुढील योग्य ती आवश्यक कार्यवाही करावी असे मा.मुख्यमंत्री महोदय यांनी निर्देश दिले आहेत. तरी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार दिनांक २३/०६/२०१५ रोजी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दालनामध्ये सुनावणी घेतली असून सदर सुनावणीमध्ये श्री.मधुकर तुकाराम शिंदे अर्जदार यांच्या कागदपत्रांची पाहणी केली व त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले तसेच या व्यतिरिक्त अधिक कागदपत्रे सादर करावीत, असे सूचित करण्यात आले आहे. सदरची कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन शासन पत्र दिनांक २१/४/२०१६ अन्वये श्री.शिंदे यांनी न्यायालयामध्ये दाखल केलेल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी अर्ज करून प्रकरणी जिल्हा परिषदमार्फत करण्यात आलेली कार्यवाही मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून लवकर निर्णय देण्याची विनंती मा.न्यायालयास करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर यांचे मार्फत गटविकास अधिकारी, पं.स.शाहूवाडी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. गटविकास अधिकारी, शाहूवाडी यांनी मे.दिवाणी न्यायालय कनिष्ठस्तर शाहूवाडी येथील रे.क.नं. ७५/२०११ मध्ये थर्ड पार्टी म्हणून अर्ज सादर केला व तो मे.न्यायालयाने मंजूर केला. त्यानुसार जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील विधिज्ञ यांचेकडून लेखी कैफियत म्हणणे तयार करुन सदरचे कैफियत म्हणणे मे.न्यायालयामध्ये सादर केले आहे. मे.न्यायालयामध्ये सदर प्रकरणी सुनावण्या सुरु असून अंतिम निर्णय प्रलंबित आहे. सदर बाब न्यायप्रविष्ठ असून सदरचे प्रकरण न्यायालयाच्या निर्णयाअंती प्रलंबित असल्याचे श्री.मधुकर तुकाराम शिंदे यांना वारंवार लेखी व सुनावणी घेऊन कळविण्यात आले आहे.

तसेच चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ग्रामसेवक श्री.योगेश राजाराम भोसले व श्री.ए.एम.मुल्ला तत्कालीन ग्रामसेवक यांचेवर खाते निहाय चौकशीचा प्रस्ताव सहाय्यक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांचेकडे पाठविणेत आला असून त्यांचे कार्यालयाकडून खाते निहाय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.कोल्हापूर यांनी श्री.शिंदे यांचेकडे मालकी हक्काचा पुरावा मागितला असता त्यांनी तो सादर केलेला नाही. तसेच श्री.शिंदे यांचे वडीलोपार्जीत घर हे त्यांचे दोन्ही भावाच्या नावे घरठाण पत्रकी नोंद आहे. ग्रामपंचायत कडील नमुना नंबर ८ घरठाण पत्रक (कर आकारणी रजिस्टर) हा मालकी हक्काचा अभिलेख नसून तो कर आकारणी करणेसाठीचा अभिलेख आहे.

तसेच ग्रामपंचायत सवते, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर कडील पदाधिकारी यांचेविरुध्द कार्यवाही करणे संदर्भाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद विधिज्ञ यांचेकडून मार्गदर्शन घेतले असता सदर प्रकरणी ग्रामपंचायतीने केलेला फेरफार योग्य की अयोग्य याबाबत मे.न्यायालयामध्ये न्यायनिर्णय झालेखेरीज ग्रामपंचायत पदाधिकारी यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३९ प्रमाणे कारवाई करणे उचित होणार नाही असा कायदेशीर अभिप्राय दिलेला आहे, म्हणून ग्रामपंचायत सवतेकडील पदाधिकारी यांचेवर अधिनियमातील सदर कलमांतर्गत कार्यवाही करता आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कुंभार समाजाच्या समस्यांबाबत

**(४४) * ३९२३४ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुंभार समाजाच्या समस्यांच्या मागण्यांचे निवेदन महासंघाच्यावतीने देण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, गोवा आदि राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही स्वतंत्र मातीकला बोर्ड स्थापन करणे, या समाजाचा भटक्या विमुक्त (एन.टी.) प्रवर्गात समावेश करणे, वीट व्यवसायासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देणे आदि मागण्यांचे निवेदन यवतमाळ प्रशासनाला देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) "कुंभार समाजाच्या प्रलंबित न्याय मागण्या त्वरीत मंजूर करणेबाबत" या विषयावरील महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) याबाबतचे निवेदन सहायक आयुक्त, समाजकल्याण, यवतमाळ कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(३) शासनास प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने, या विभागाशी संबंधित विषयावर अहवाल सादर करण्याच्या सूचना संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक १६/०२/२०१८ ला देण्यात आल्या आहेत. तसेच इतर मागण्या इतर विभागाशी संबंधित आहेत. त्याबाबत योग्य कार्यवाहीसाठी निवेदनाची प्रत संबंधित विभागाला देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोर्ले (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) गावातून पारगड किल्लामार्गे कोल्हापूरला जोडणाऱ्या रस्त्याचे कामाबाबत

**(४५) * ४००६३ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्ले (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) गावातून पारगड किल्लामार्गे कोल्हापूरला जोडणाऱ्या मार्गास मंजूरी मिळाली असून रस्त्याचे काम अत्यंत धिम्यागतीने सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ता एकूण ९.५० कि.मी.अंतराचा असून त्यापैकी सुमारे ६ कि.मी. वन विभागाच्या अखत्यारित येत असून काम सुरू केले जात नसल्याने मोर्ले, पारगड ग्रामस्थांनी दोडामार्ग वनक्षेत्रपालांना घेराव घालून आंदोलन केले असता, सुमारे ६ कि.मी. वन खात्याच्या हद्दीतील रस्त्याचे काम दिनांक २१ जानेवारी, २०१८ अखेरपर्यंत पूर्ण करून देण्याचे आश्वासन वन विभागाच्यावतीने देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाकडून ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी मोर्ले, पारगड ग्रामस्थांनी पुन्हा दोडामार्ग वनक्षेत्रपालांना घेराव घालून काम त्वरीत करण्यासाठी दोडामार्ग वन विभागाच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा लेखी निवेदनाद्वारे इशारा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वन खात्याच्या अखत्यारीतील रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) केंद्रीय पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालयाने सदर रस्त्याकरीता सिंधुदुर्ग व कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण २०.४२९ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणास काही अटींच्या अधीन राहून दिनांक १२/०१/२०१५ रोजी तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. केंद्र शासनाच्या तत्वत: मान्यता आदेशातील आवश्यक अटींची जसे की, नक्त वर्तमान मूल्य (NPV), पर्यायी वनीकरणासाठीची रक्कम व वनेत्तर क्षेत्र वन विभागास हस्तांतर

इ.बाबत पूर्तता अहवाल प्रकल्प यंत्रणेने सादर केल्यानंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये वनक्षेत्रावर काम सुरु करण्यास परवानगी दिली आहे.

(२) व (३) मौजे-मोर्ले, पारगड (जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामस्थांनी वनक्षेत्रपाल, दोडामार्ग यांना घेराव घालून प्रस्तुत रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्याची मागणी केली आहे. तथापि, बेमुदत उपोषणासाठी लेखी निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) केंद्र शासनाच्या दिनांक १२/०१/२०१५ रोजीच्या तत्वत: मान्यता आदेशातील आवश्यक अटींचा पूर्तता अहवाल प्राप्त होताच मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये वनक्षेत्रावर काम सुरु करण्यास परवानगी दिली आहे.

-----------------

## जायकवाडी धरणाच्या कालव्याची वहन क्षमता वाढविण्याबाबत

**(४६) * ३७७६३ श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्याची वहन क्षमता वाढविण्यासाठी कालवा दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करण्याची मागणी दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास, तसेच गोदावरी नदीवरील जायकवाडी धरण १०० टक्के भरलेले असल्याने धरणातील पाण्याच्या वापराचे योग्य नियोजन करुन लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना पुढील दोन वर्षांच्या सिंचनाची हमी देण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी दिनांक २१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जायकवाडी धरणाच्या कालव्याची वहन क्षमता वाढवून धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी किमान दोन वर्ष पाणी मिळेल यासाठी तसेच जायकवाडीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची हमी देण्यासाठी धरणाच्या उपलब्ध पाण्याचे पुढील दोन वर्षांचे नियोजन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा नियोजन केले आहे,

(३) जायकवाडी धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून त्यांच्या प्रकल्पीय वहन क्षमतेप्रमाणे पाणी वाहून नेण्याची क्षमता सध्या नसल्याने पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणावर होत आहे, तसेच जायकवाडी धरणाच्या कालवे व त्यांच्या वितरीका आणि चाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाल्यामुळे सिंचनासाठी शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने व कालव्यांची मूळ प्रकल्पीय वहन क्षमता कायम ठेवण्यासाठी, तसेच धरणातील उपलब्ध पाणी नदी पत्रातील बॅरेज व बंधाऱ्यात सोडण्याबाबत आणि कालवा दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्याची वहन क्षमता वाढविण्यासाठी व पाण्याची गळती थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दिनांक २६/०९/२०१७ च्या पत्रान्वये केलेली आहे. तसेच त्यांनी त्यांच्या दिनांक २१/१०/२०१७ च्या पत्रान्वये जायकवाडी प्रकल्प १००% भरला असल्याने धरणातील पाणी वापराचे धोरण ठरविणेबाबत मागणी केलेली आहे.
(२) शासन प्रचलित नियमाप्रमाणे जायकवाडी प्रकल्पामध्ये दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावर आधारित सिंचनाचे व बिगर सिंचनाचे नियोजन मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मंजुर करण्यात येते. सदर पाणीवापर नियोजन एक वर्षाचे कालावधी पुरतेच मर्यादित असते. जायकवाडी प्रकल्पात दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी १००% पाणी साठा उपलब्ध झाल्याने पाणी साठ्यावर नियोजन दिनांक १३/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये निश्चित करण्यात आले आहे.

(३) पैठण डाव्या कालव्याची संकल्पीत वहन क्षमता ३६०० क्युसेक्स तुलनेत प्रत्यक्ष वहन क्षमता २००० क्युसेक्स इतकी आहे. पैठण उजवा कालव्याची संकल्पीत वहन क्षमता २२५० क्युसेक्स असतांना प्रत्यक्ष वहन क्षमता ९०० क्युसेक्स आहे. कालव्याची वहन क्षमता कमी असल्याने पाणी पाळी कालावधीत वाढ होते.

पैठण उजवा कालवा काळ्या मातीतून, भरावातून जातो. तसेच कालवा अस्तरीकरण (Lining) खराब झाल्यामुळे कालव्यात पूर्ण क्षमतेने विसर्ग सोडण्यात येत नाही. वितरीका, चाऱ्या, उपचाऱ्या बांधकामे, (Structure) अंशतः इत्यादी नादुरुस्त असल्यामुळे पूर्ण क्षमतेने पाणी सोडता येत नाही.

तथापि, जायकवाडी प्रकल्पावर युध्द पातळीवर शासकीय यंत्रसामुग्री वापरुन सातत्याने कालव्यांची दुरुस्ती करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत आहे. तसेच उपलब्ध निधीच्या अनुषंगाने दुरुस्तीची नियमीत कामे हाती घेऊन प्राप्त मागणीवर आधारित प्रत्येक सिंचन आर्वतनाचे नियोजन करण्यात येते. त्याप्रमाणे सन २०१७-१८ मध्ये रब्बी हंगामात ३ पाणी पाळया राबविण्यात आलेल्या असून चौथी पाणी पाळी सध्या चालू आहे. वरील पाणी पाळीच्या कालावधीत मागणीप्रमाणे सिंचन झालेले आहे.

(४) कालवा दुरुस्तीसाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत व सन २००५ च्या सिंचन (MMISF) अधिनियमानुसार पैठण उजव्या कालव्याच्या संपूर्ण लाभक्षेत्रात ४५७२५ हे. (बॅरेजसवर भिजणारे क्षेत्र वगळून) लागवडी योग्य क्षेत्रावर पाणी संस्था स्थापन करुन, कालव्याचे संपूर्ण क्षेत्र मार्च-२०२२ पर्यंत टप्या टप्याने हस्तांतरित करण्याचे नियोजित आहे.

(MMISF) Act-२००५ लागू करणेसाठी व पाणीवापर संस्थेला Entitlement देण्यासाठी पैठण उजवा कालवा लाभक्षेत्रातील विशेष दुरुस्तीची अंदाजपत्रके सादर करणेसाठी कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुद्रांक शुल्क थकविल्याबाबत

**(४७) * ३८२७२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेला शासनाकडून मुद्रांक शुल्कापोटी रुपये १४ कोटी १३ लाख ९६ हजार ५०२ इतकी रक्कम देणे असल्याने सदर मुद्रांक शुल्कापोटीची रक्कम मिळण्यासाठी जिल्हा परिषदेने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक विभागाच्या उपसंचालकांकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मुद्रांक शुल्कापोटीची रक्कम जिल्हा परिषद, यवतमाळ यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अहवालानुसार यवतमाळ जिल्हा परिषदेला सन २०१६-१७ पर्यंत मुद्रांक शुल्कापोटी रुपये ५.७३ कोटी इतके अनुदान देय आहे.

सन २०१७-१८ वर्षासाठी उपलब्ध तरतूदीमधून यवतमाळ जिल्हा परिषदेस यापुर्वी रुपये ३.५८ कोटी तरतूद वितरीत करण्यात आली असून उर्वरीत रुपये १.०२ कोटी इतकी तरतूद वाटप करण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक २८/०२/२०१८ रोजी सुपूर्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात पदे रिक्त असल्याबाबत

**(४८) * ३७८६० डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ६० पदे रिक्त असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकीय अधिकाऱ्यांसह लिपीकवर्गीय, अनुभवी परिसेविका तसेच अन्य विविध संवर्गातील पदे देखील रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने त्याचा ताण सेवेतील डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर येत असून त्याचा विपरीत परिणाम रुग्ण सेवेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यविषयक सुविधांचा विचार करता नाशिक जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक, मुख्य प्रशासकीय अधिकारी, अधिसेविका, प्रशासकीय अधिकारी आणि चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे विशेषज्ञ गट अ (ग्रेड पे ६६००) ची एकूण २१ पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे भरण्यात आली आहेत व ०९ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट अ वर्ग-२ (ग्रेड पे ५४००) ची एकूण ४२ पदे मंजूर असून ४२ पदे भरण्यात आली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा रूग्णालय, नाशिक येथे मुख्य प्रशासकीय अधिकारी चे १ पद मंजूर असून सध्या रिक्त आहे. तसेच प्रशासकीय अधिकारी चे १ पद मंजूर असून ते रिक्त आहे. वर्ग-३ ची एकुण ३०३ पदे मंजूर असून त्यापैकी २७१ पदे भरलेली आहेत व ३२ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ ची एकूण २८९ पदे मंजूर असून २१५ पदे भरलेली आहेत व ७४ पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) वैद्यकीय अधिकारी गट-अ ची सर्व पदे भरली असून विशेषज्ञ गट अ, मुख्य प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, अधिसेविका ही पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे. तसेच वर्ग-३ वर्ग-४ कर्मचाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर करण्यात येत आहे.

-----------------

## भंडारा जिल्हा परिषदेंतर्गत आंतरजिल्हा बदलीबाबत

**(४९) * ३८०८६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा परिषदेंतर्गत आंतरजिल्हा बदलीबाबत दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ रोजी शिक्षकांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले असून त्यात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच आचार संहिता काळात रोस्टर मंजूरी पूर्वी बदलीचे आदेश निघाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेस्तरावरुन चौकशी करण्यात आली असून, याप्रकरणी दोषी असलेले ०२ लिपीक यांना निलंबित करणे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांची १ वेतनवाढ रोखणे, सहाय्यक प्रशासन अधिकारी यांची सेवानिवृत्तीवेतनातून ५ टक्के रक्कम

रोखणे अशा प्रकारची कारवाई करण्यात आली असून, तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील आदिवासीबहूल भागात होणारे बालमृत्यू रोखण्याबाबत

**(५०) * ३९१३४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात बालमृत्यूच्या संख्येत वाढ होत असल्याने या बालकांना तातडीने उपचार मिळण्याकरिता जव्हार, मोखाडयात नवजात शिशु अतिदक्षता कक्षांची संख्या वाढविण्यात येणार असल्याची माहिती मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यानुसार आतापर्यंत किती शिशु अतिदक्षता कक्षांची स्थापना करण्यात आली व ही कक्षे सद्य:स्थितीत कार्यान्वित करण्यात आली आहेत काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अतिदक्षता कक्षांच्या संख्येत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) पालघर जिल्ह्यामध्ये सन २०१४-१५ ते २०१७-१८ डिसेंबरपर्यंत दरवर्षी अनुक्रमे ६२६, ५६५, ५५७ व ३६१ इतके बालमृत्यू झालेले असून या बालमृत्यूंच्या आकडेवारींमध्ये घट दिसून येत आहे.

पालघर जिल्हयामध्ये विशेष नवजात काळजी कक्ष उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे सन २०१३ पासून कार्यरत असून जव्हार, मोखाडा व जवळपासच्या तालुक्यातील गंभीर आजारी बालकांना जव्हार येथे संदर्भीत करुन उपचार केले जातात.

(२) व (३) राज्यात सद्य:स्थितीत ३६ विशेष नवजात काळजी कक्ष कार्यान्वित असून सन २०१८-१९ मध्ये नविन ५ विशेष नवजात काळजी कक्षांची स्थापना करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी आरोग्य सेविकांना अतिरिक्त दाखवून कार्यमुक्त केल्याबाबत

**(५१) * ३९०९७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत माहे एप्रिल, २००८ ते २०१२ पर्यंत कार्यरत ९६ कंत्राटी आरोग्य सेविकांना (एएनएम) माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये अतिरिक्त दाखवून कार्यमुक्त करण्यात आले परंतु, ५२ आरोग्य सेविकांना पुनर्नियुक्तीपासून वंचित ठेवण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडे निवेदने देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, गोंदिया यांनी मंजूर पदांपेक्षा जास्त पदे भरल्याचे निदर्शनास आल्याने ९७ कंत्राटी आरोग्य सेविकांना कार्यमुक्त करण्यात आले होते. तथापि, त्यापैकी ५४ कंत्राटी आरोग्य सेविकांना समायोजनाने पुनर्नियुक्ती देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पर्यटनाला प्रोत्साहन देवून राज्याचा महसूल वाढविण्याबाबत

**(५२) * ३९३८९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यटनाला प्रोत्साहन देवून त्याबरोबर राज्याचा महसूल वाढविण्याच्या उद्देशाने एम.टी.डी.सी. च्या माध्यमातून उभारलेली कोट्यवधींची हॉटेल्स, रिसॉर्टस पर्यटन विकास महामंडळाच्या नियोजन शून्यतेमुळे दिवाळखोरीत गेल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटन महामंडळाकडून मालमत्ता भाड्याने देताना करार योग्य प्रकारे न झाल्याने भाडे करार संपल्यानंतरही आधीचेच ठेकेदार त्या मालमत्ता वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्‌नूसार पर्यटन विकास महामंडळाच्या अखत्यारितील हॉटेल्स, रिसॉर्ट्सवर पर्यटकांचा ओघ वाढून महसूल वाढविण्याच्या अनुषंगाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) नाही.

(२) महामंडळाच्या मालमत्ता ज्या भाडेपट्टाधारकांच्या ताब्यात आहेत त्या मालमत्ता भाडेकरार संपुष्टात आल्यानंतर रितसर परत घेतल्या जातात. मात्र, ज्या मालमत्तांचा भाडेकरार संपुष्टात आलेला आहे. परंतु, अशा मालमत्तांच्या निविदा प्रक्रिया विहीत वेळेत पूर्ण होऊ शकल्या नाहीत अशाच मालमत्तांकरिता निविदा प्रक्रिया अंतिम होण्याच्या अधीन राहून तात्पुरती मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैद्यकीय व्यवसायातील कट प्रॅक्टिसमुळे रुग्णांची आर्थिक लूट होत असल्याबाबत

**(५३) * ३९६८८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंडियन मेडिकल कौन्सिलची कट प्रॅक्टिसबाबतच्या तक्रारीची दखल घेण्यासाठी समिती नेमण्यात आली असूनही तत्संदर्भात कारवाई होत नसल्याने वैद्यकीय व्यावसायातील कट प्रॅक्टिसमुळे रुग्णांची होणारी लूट तसेच रुग्णांवरील अन्यायकारक बाबी रोखण्यासाठी परिणामकारक कायदा करण्याची बाब दीर्घकाळापासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) या संदर्भात अद्यापी निर्णय घेण्यात आलेला नाही.

कट प्रॅक्टीसचा कायदा तयार करण्यासाठी शासनाने दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी समितीची स्थापना केली. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक २७/१०/२०१७ रोजी सादर केला होता. या संदर्भात मा.मंत्री (वै.शि.) यांच्याकडे बैठक घेऊन विचारविनिमय करण्यात आला. सदर मसुदा अंतिम करण्यापूर्वी, प्रस्तावित कायद्यामध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी उक्त समितीने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून सूचना मागविण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार समितीने परिषदेकडून सूचना मागविलेल्या आहेत.

-----------------

## राज्यात सॅनिटरी पॅडवरील जी.एस.टी. रद्द करण्याबाबत

**(५४) * ३९६२८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात माहे जुलै, २०१७ मध्ये जी.एस.टी. ची अंमलबजावणी करण्यात आल्यानंतर महिलांच्या आरोग्याच्यादृष्टीने महत्वाच्या असलेल्या सॅनिटरी पॅडवर जी.एस.टी. परिषदेने १२ टक्के दर आकारला असून तो रद्द करण्याची मागणी दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली व जी.एस.टी. परिषदेमध्ये महिला सदस्यांचा समावेश असावा, अशीही मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जी.एस.टी. कराची आकारणी करताना महिलांच्या बांगड्या, कुंकू इत्यादी वस्तूंवर शून्य टक्के जी.एस.टी. आकारण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी जी.एस.टी. परिषदेने २९ वस्तूंवरील जी.एस.टी. कर माफ करताना महिलांसाठी आवश्यक असणाऱ्या सॅनिटरी पॅडवरील जी.एस.टी. रद्द करण्यात यावा यासाठी ठाणे येथील जी.एस.टी. अतिरिक्त आयुक्तांना मोर्चाद्वारे निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सॅनिटरी पॅडवरील जी.एस.टी. रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे अंशतः खरे आहे. सॅनिटरी नॅपकीन्सवरील कर रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. जीएसटी परिषदेमध्ये महिला सदस्याचा समावेश असावा अशी मागणी या कार्यालयास प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) वस्तू व सेवा कर अधिनियमांतर्गत वस्तू व सेवावरील कराचे दर शिफारस करण्याचे अधिकार वस्तू व सेवा कर परिषदेस आहेत व परिषदेने शिफारस केलेल्या दराप्रमाणेच कराची आकारणी करण्याची शासनाची भूमिका आहे.
(५) लागू नाही.

-----------------

## पालखेड (जि.नाशिक) धरण समूहातील लाभधारक शेतकरी व पाणीवापर संस्थांच्या मागणीबाबत

**(५५) * ३९२४९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालखेड (जि.नाशिक) धरण समूहातील लाभधारक शेतकरी व पाणीवापर संस्थांच्या मागणीप्रमाणे आवर्तनाचा निर्णय न झाल्यामुळे लाभक्षेत्रातील पाणीवापर संस्थांनी पाणीवाटपावर बहिष्कार टाकल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त लाभक्षेत्रातील पीक नियोजन धोक्यात आल्याने पालखेड डावा कालव्यातील वहन व्ययाबाबत विभागाने फेरतपासणी करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यामुळे पालखेड लाभक्षेत्रातील कपात झालेल्या क्षेत्रामुळे शिल्लक राहणाऱ्या ३१०.५७ दलघफु पाण्यातून वितरीका क्र. ४६ ते ५२ हा खरीप कालवा आठमाही करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांचेकडे मागणी केली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे.

श्री.संतु पा. झांबरे, अध्यक्ष, बळीराज्य पाणी वापर सहकारी संस्थांचा संघ लि. येवला यांनी दिनांक ४/१२/२०१७ रोजी निवेदन दिलेले आहे.

(२) व (३) होय.

(४) जलसंपदा विभागांतर्गत चारी क्र. ३३, ३४, ३५ वरील ज्या पाणी वापर संस्थाच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले, त्या पाणीवापर संस्थेच्या लाभधारकांना शासनामार्फत पाणी देण्यात आलेले आहे.

नांदुर मधमेश्वर कालव्यामुळे कपात झालेल्या २९३० हे. क्षेत्रामुळे ३१०.५७ द.ल.घ.फु. पाणी बचत झाल्याचे नमूद केलेले असले तरी सद्य:स्थितीत बिगर सिंचनाचे आरक्षणामध्ये लक्षणीय वाढ झाल्याने सिंचनासाठी कमी पाणी उपलब्ध होते. त्या पाण्यामधून प्रकल्पीय नियोजनानुसार निर्धारीत क्षेत्रास पाणी देणे शक्य होत नाही. त्यामुळे पाण्याची उपलब्धता व पालखेड डावा कालवा कि.मी. ११० ते १३० व चारी क्र. ४६ ते ५२ करीता रब्बी हंगामासाठी तरतुद नसल्याने व उर्ध्व गोदावरी खोरे हे तुटीचे खोरे असल्याने हा खरीप कालवा आठमाही करणे संयुक्तिक होणार नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(५६) * ३८९१७ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे इंडियन मेडीकल असोसिएशन व सार्वजनिक स्वास्थ्य विभाग रा.तु.म. कर्करोग रुग्णालयाच्या माध्यमातून भरविण्यात आलेल्या चर्चासत्रात डोक्याचा, मानेचा कर्करोग मोठया प्रमाणात राज्यात वाढत असल्याचे तज्ञ डॉक्टरांकडून सांगण्यात आल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्करोगास आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटल व रिसर्च सेंटर, नागपूर या रुग्णालयाच्या माध्यमातून याबाबत चर्चासत्र झाले आहे. मुंबई आणि बार्शी येथील कॅन्सर रजिस्ट्रीनुसार मुख कर्करोग वगळता इतर कर्करोगामध्ये वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

(२) कोणत्याही कर्करोगासाठी विशिष्ट असे कारण आढळून येत नाही. कर्करोगास आळा घालण्यासाठी आरोग्याची काळजी घेणे व उत्तम आरोग्य ठेवणे आवश्यक आहे. कर्करोगास बऱ्याच वेळा चुकीची जीवनपध्दती कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते. आहार, प्रदुषण, तंबाखुचे सेवन, घातक रसायनांचे खाद्यपदार्थांमधील अंश इ. अनेक बाबी कर्करोगासाठी कारणीभूत ठरतात. ही बाब विचारात घेता कर्करोगास आळा घालण्यासाठी जनजागृती करणे अतिशय महत्वाचे आहे.

शासकीय रुग्णालयातील असंसर्गजन्य रोग नियंत्रण कक्षामार्फत युनिवर्सल स्क्रीनींग वर्धा, भंडारा, सातारा व सिंधुदुर्ग ह्या ४ जिल्ह्यांमध्ये कॅन्सरची तपासणी करुन रुग्णांना पुढील उपचाराकरिता संदर्भित करण्यात येते. दिनांक १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत राज्यभरात मुख स्वास्थ मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत मुख कर्करोगाबाबत जनजागृती करण्यात आली. टाटा मेमोरियल रुग्णालयाच्या मदतीने जिल्हा

रुग्णालयांत कॅन्सर वॉरियर्सच्या मार्फत बाह्य व अंतर्गत रुग्ण विभागात कॅन्सरच्या सेवा दिल्या जातात. महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य जीवनदायी योजनेंतर्गत कर्करोगग्रस्त रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार उपलब्ध करुन दिले जातात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील शौचालय गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(७७) * ४०४१७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) शौचालय गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी बीडीओ (गटविकास अधिकारी) यांना दिले असता त्यांनी या गैरव्यवहारातील आरोपी ग्रामसेवकास अहवाल तयार करण्यास सांगितल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) होय, ग्रामपंचायत, ताडवागळे मध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी प्राप्त झालेले शासकीय अनुदान शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाल्यावर व योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील पूर्ण केलेल्या कामांची देयके निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(५८) * ३८१६० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकराव्या वित्त आयोगातून अकोला जिल्हयातील सन २००४-०५ मध्ये जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत रस्ते, लहान पूल, इमारत बांधकाम इत्यादी कामे पूर्ण केलेली असतांनाही अदयापी निधी अभावी कामांची देयके प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने प्रलंबित देयके अदा करण्याकरिता वित्तीय तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) केंद्रीय वित्त आयोगाचा कालखंड हा ५ वर्षासाठी असतो. त्यानुसार ११ व्या वित्त आयोगाचा कालखंड २०००-२००५ असा होता. केंद्रीय वित्त आयोगाच्या प्राप्त होणाऱ्या निधीतून कामांचे नियोजन करताना उपलब्ध निधीच्या मर्यादेतच कामाचे नियोजन करणे आवश्यक असते. त्यामुळे ११ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जी अधिकची कामे जिल्हा परिषदेकडून करण्यात आली आहेत, ती अनुज्ञेय बाबींवर केली असल्याने त्यावर झालेला जादा खर्च जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून भागविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

कंत्राटदारांची देयके तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असल्याने जिल्हा परिषद स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात तरतूद करुन जिल्हा परिषद स्थायी समितीच्या मंजुरीकरीता प्रस्ताव सादर केला असता, विषयसूचीवर घेण्यात आला नसल्याने देयके अद्यापि प्रलंबित आहेत. प्रलंबित देयके जिल्हा परिषदेने स्वउत्पन्नातून अदा करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार कामाची प्रलंबित देयके अदा करण्यासंबंधीची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना देण्यात आल्या आहेत. सन २०१८-१९ मध्ये जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाचे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात "जीवन अमृतसेवा" योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५९) * ४०४५२ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गरजू रुग्णांना शासकीय शुल्कामध्ये इच्छित स्थळी रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने दिनांक ६ जानेवारी, २०१४ पासून "जीवन अमृतसेवा" (Blood on Call) योजना सुरु करुन तासाभराच्या आत थेट रुग्णालयात रक्त पुरविण्याची सुविधा मिळावी म्हणून १०४ या क्रमांकाची टोल फ्री हेल्पलाईन सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चार वर्षाचा कालावधी होऊनही मुंबईत उभ्या राहणाऱ्या आठ रक्त साठवण केंद्रापैकी अद्यापी एकही केंद्र उभारण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गरीब रुग्णांना दुप्पट किंमतीने म्हणजे रुपये १४५० या दराने खाजगी रक्त पेढ्यातून रक्त खरेदी करावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने "जीवन अमृतसेवा" योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे, दिनांक ०७ जानेवारी, २०१४ पासून राज्यात जीवन अमृत सेवा ब्लड ऑन कॉल योजना सुरु करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही, मुंबईत ८ रक्त साठवणूक केंद्रापैकी ४ रक्त साठवणूक केंद्र कार्यान्वीत झालेली आहे.

(३) हे खरे नाही, राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने व शासनाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे शासकिय रक्तपेढी मार्फत रुपये ८५०/- व खाजगी रक्तपेढी मार्फत रुपये १४५०/-एवढे प्रक्रिया शुल्क आकारण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इसवली सुतारवाडी व्हाया रेवटेवाडी ते नवलाईदेवी मंदिर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(६०) * ४००१९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ३३४०७ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसवली सुतारवाडी व्हाया रेवटेवाडी ते नवलाईदेवी मंदिर (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या रस्त्याची दुरवस्था झाल्याने त्याठिकाणी एस.टी. बस सेवा सुरु नाही तसेच वाहतुकीच्या सोई-सुविधा नसल्यामुळे वैद्यकीय सोई सुविधांसाठी, शालेय विद्यार्थ्यांना शाळेमध्ये जाण्यासाठी आणि मुख्य बाजारपेठेमध्ये जाण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण त्वरीत व्हावे याकरीता श्री.नवलाईदेवी ग्रामविकास मंडळ (इसवली) यांनी दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास रत्नागिरी जिल्हा परिषदेस इसवली-पनोरे यांना पत्राव्दारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे. सदर रस्त्यावर एस.टी.बस सेवा सुरु नाही. तथापि, बारमाही खाजगी वाहतुक सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित इसवली सुतारवाडी प्राथमिक शाळा ते रेवटेवाडी प्रजिमा ६३ ला जोडणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११२ आहे. या रस्त्याची एकूण लांबी ३.५०० कि.मी. असून त्यापैकी २.६५० कि.मी. लांबी खडीपृष्ठभागाची व ०.८५० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची आहे.

सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विधवा किंवा विभक्त महिलांच्या मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावण्याच्या प्रस्तावाबाबत

**(६१) * ४०१९४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विधवा किंवा विभक्त महिलांच्या मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावण्यासाठी शासनाने सुरु केलेली अनुदान योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सात वर्षात अवघ्या १२ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेची प्रसिद्धी होत नसल्याने तिला मिळणारा प्रतिसाद अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

निराधार, विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अनुदान योजनेचा समावेश दिनांक ३०/०९/२०११ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेल्या शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजनेत करण्यात आला असून, सदर योजना सुधारित स्वरुपात जिल्हा नियोजन समितीमार्फत संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे.

(२) व (३) नाही.

सदर योजनेचा लाभ आतापर्यंत ६०८ निराधार/ परित्यक्ता/ विधवा महिलांनी घेतला आहे. सदर योजनेसंदर्भातील माहिती पत्रके, रेडिओ झिंगल्स, माहिती पुस्तिका याव्दारे तसेच वेळोवेळी आयोजित करण्यात आलेले महिला मेळावे, महिलांचे कार्यक्रम, जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम व जिल्हास्तरावर घेण्यात येणारे प्रचार प्रसिध्दीचे मेळाव्यांच्या माध्यमातून सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील अंगणवाडयांमध्ये बालकांना पोषण आहार मिळाला नसल्याबाबत

**(६२) * ४०४१३ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील येथील अंगणवाडयांमध्ये दररोज पोषण आहार दिला जात असून मागील काही दिवसापासून सुमारे बाराहून अधिक गावातील ३० अंगणवाडयांमधील बालकांना शासनामार्फत दिला जाणारा पोषण आहार मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बालकांची उपासमार होऊ नये म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी, २०१८ मध्ये ३ ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना (बार्शी प्रकल्प-४०८३ लाभार्थी व वैराग प्रकल्प-४००१ लाभार्थी) या लाभार्थ्यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये गरमताजा आहार वाटप केलेला आहे.

माहे जानेवारी, २०१८ मध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर माता, स्तनदा माता या लाभार्थ्यांना (बार्शी प्रकल्प-५५८५ लाभार्थी व वैराग प्रकल्प-५८६० लाभार्थी) या लाभार्थ्यांना २५ दिवस घरपोच आहाराचे वाटप करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवीन नांदेड येथील विष्णुपूरी प्रकल्पातील पाण्याबाबत

**(६३) * ४०६७७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन नांदेड येथील विष्णुपूरी प्रकल्पातून पाण्याचा पुरवठा करणारी पाईपलाईन अनेक ठिकाणी फुटली असून यातून लाखो लिटर पाणी वाया जात असूनही पाटबंधारे विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने फुटलेल्या पाईपलाईनची दुरुस्ती करुन पाटबंधारे विभागातील संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) जानेवारी, २०१८ च्या दरम्यान विष्णुपूरी प्रकल्पातून पाणी वाहून नेणाऱ्या सदर पाईपलाईनला काही ठिकाणी छिद्रे पडल्याचे व ल्याप प्लेट व मॅनहोल मधून काही प्रमाणात तसेच उध्दरण नलिकेच्या प्रसरण सांध्यांमधून काही प्रमाणात पाणीगळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) यांत्रिकी विभागातर्फे अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी पाणी गळती संदर्भात उध्दरण नलिकेची संयुक्त पाहणी करुन त्यापैकी पाईपलाईनला पडलेली छिद्रे, ल्याप प्लेट व मॅनहोल यामधून होणारी पाणी गळती दुरुस्ती कामे करुन तातडीने बंद करण्यात आली आहेत. गळती होत असणाऱ्या प्रसरण सांध्याची पुर्ण दुरुस्ती पाणी पाळी दरम्यान करणे शक्य नसल्यामुळे सदरील दुरुस्ती ही यावर्षीच्या पाणी पाळया संपल्यानंतर करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे उळे (जि.सोलापूर) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाच्या बनावट सहया करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(६४) * ४०७०३ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उळे (जि.सोलापूर) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाच्या बनावट सह्या करुन १० लाख ६२ हजार रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उळे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकाच्या बनावट सहया करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींना तातडीने अटक करावी अन्यथा प्रखर आंदोलन करण्याचा इशारा सोलापूर ग्रामसेवक संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

१४ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ग्रामसेवक श्री.बाळू चन्नप्पा चौगुले यांनी दिनांक ०८/०१/२०१८ रोजी ग्रामपंचायत उळे यांचे बँक ऑफ इंडिया, वाळी वेस शाखा येथे १४ व्या वित्त आयोगाच्या बचत खात्याची चौकशी केली असता सदर खात्यातून रुपये १०,६२,०००/- एवढया रकमेची धनादेशाने वजाती झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानंतर श्री.चौगुले यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांना सादर केलेल्या लेखी अहवालान्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांनी त्यांचेकडील दिनांक १०/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये श्री.चौगुले यांना श्री.ज्ञानेश्वर रामचंद्र खंडागळे व सरपंच सौ.पद्मीनी रामचंद्र खंडागळे यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार श्री.चौगुले, ग्रामसेवक यांनी भारतीय दंड संहिता ४०९, ४२०, ४६७, ४६८, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असून याबाबत सोलापूर तालुका पोलीस स्टेशन यांचेकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा नियोजनाचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(६५) * ४०८६४ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा नियोजन समितीस माहे डिसेंबर, २०१७ मध्ये सन २०१७-१८ साठी ३० टक्के कपात होऊन रुपये १४० कोटींचा निधी प्राप्त झाला असून, सदर निधी खर्च झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अखर्चित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ करीता रुपये १७०.९९ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक ३०/०६/२०१७ मधील सूचनांनुसार महसूली व भांडवली खर्चाच्या मर्यादेनंतर रत्नागिरी जिल्ह्याला रुपये १३९.७६ कोटी निधी उपलब्ध करण्यात आला आहे. त्यापैकी माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर रुपये २९.८६ कोटी खर्च झालेला आहे.

(२) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांचेकडून प्राप्त माहितीनुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ मध्ये राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांचा केंद्र हिस्सा प्राप्त न झाल्यामुळे या योजनेचा राज्य हिस्सा रुपये ४५.५८ कोटी वितरीत करण्यात आला नाही. वित्त विभागाच्या दिनांक ०१/०२/२०१८ च्या परिपत्रकानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१७-१८ मधील १००% तरतूद उपलब्ध झाली असून, आतापर्यंत रुपये ८६.९५ कोटी निधी वितरीत झाला असून, रत्नागिरी जिल्ह्याला उपलब्ध करण्यात आलेला सर्व निधी माहे मार्च, २०१८ अखेरपर्यंत खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राईपाडा ते भालतपाडा (ता.जि.पालघर) रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(६६) * ४०७९१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी पाडयांतील (ता.जि.पालघर) राईपाडा ते भालतपाडा या कच्च्या रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण व दुरुस्ती करण्याची मागणी तेथील नागरिकांनी दिनांक २७ डिसेंबर, २०१७ व दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री, सचिव, ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी विकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्याचे काम पावसाळयापूर्वी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक २७ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये नागरिकांनी सचिव, ग्रामविकास यांच्याकडे सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत मागणी केली आहे.
(२) प्रश्नांकित रा.मा.क्र. ७५ ते भालतपाडा ते इजिमा २५ ला जोडणारा रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र. २७४ असून या रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे. सदर लांबीपैकी ००/ते १/०० कि.मी. व २/५०० ते ३/०० कि.मी. लांबी डांबरी पृष्ठभागाची, १/०० ते १/५०० कि.मी. लांबी माती पृष्ठभागाची व १/५०० ते २/५०० कि.मी. लांबी खडी पृष्ठभागाची आहे.

सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंबसुरे (ता.उरण, जि.रायगड) इंद्रायणी डोंगराला लागलेल्या आगीबाबत

**(६७) * ३९९६१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) चिरनेरच्या इंद्रायणी डोंगराला माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आग लागली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंद्रायणी डोंगर परिसराला लागलेल्या आगीत अनेक पशु पक्ष्यांचे जनजीवन उद्ध्वस्त झाले असून डोंगरात असलेल्या औषधी वनस्पतीही जळून खाक झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जंगलाची जाळरेषा काढण्यासाठी शासनाकडून कमी निधी मिळत असल्यामुळे सर्वच ठिकाणी जाळरेषा काढता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) चिरनेरच्या इंद्रायणी डोंगर परिसरातील मौजे कळंबसुरे वन स.नं. १६६ व १६७ मध्ये माहे जानेवारी, २०१८ मध्ये आग (वणवे) लागल्याचे निदर्शनास आलेले असून त्यामध्ये एकूण ११.०० हे. क्षेत्र जळाले आहे.

(२) सदर आगीमध्ये अनेक पशु पक्ष्यांचे जनजीवन उदध्वस्त झाल्याचे तसेच डोंगरात असलेल्या औषधी वनस्पतीही जळून खाक झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदरची आग ही मुख्यत्वे ग्राऊंड फायर या प्रकारातील असल्याने सदर आगीमध्ये केवळ पालापाचोळा जळाला आहे.

(३) जंगलाची जाळरेषा काढण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो. त्यानुसार अतिसंवेदनशील क्षेत्रात जास्तीत जास्त जाळरेषा घेण्यात येतात.

(४) व (५) सदरच्या आगीबाबत दिनांक ३१/०१/२०१८ अन्वये वन गुन्हा नोंदविण्यात आलेला असून आरोपीचा तपास सुरु आहे.

-----------------

## औरंगाबाद येथील शासकीय कर्करोग रुग्णालयातील समस्यांबाबत

**(६८) * ३८०३० श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय कर्करोग रुग्णालय हे औरंगाबाद विभागातील सर्वात मोठे कर्करोग रुग्णालय असून रुग्णालयाच्या विविध समस्यांबाबत उपाययोजना करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक १० जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) मराठवाडा विभागातील सर्वात मोठ्या शासकीय कर्करोग रुग्णालयात दिनांक १२ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार कनिष्ठ निवासी १, २ व ३ डॉक्टरांची ७२ पदे मंजूर करण्यात आली असून केवळ त्यांचे निश्चित वेतन अत्यंत अल्प असल्याने सदरची पदे अद्याप रिक्त आहेत तसेच कनिष्ठ निवासी डॉक्टरांच्या रिक्त पदामुळे उक्त रुग्णालयातील प्रोफेसर व तत्सम वरिष्ठ तज्ञ डॉक्टरांवर कामाचा अधिक ताण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रुग्णालयातील कनिष्ठ निवासी, रिसर्च फेलो यांची मंजूर रिक्त पदे भरणे, रेडिएशनसारख्या उपचारांसाठी लागणारा प्रतिक्षा कालावधी कमी करणे, जुनाट व कालबाह्य औषधी ऐवजी नवीन संशोधित औषधांचा पुरवठा करणे, कनिष्ठ निवासी डॉक्टरांच्या रुपये १४०००/- निश्चित केलेल्या विद्या वेतनात योग्य ती वाढ करून सदरची रिक्त पदे भरणेबाबत तसेच लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, रुग्णालयास राज्य कर्करोग संस्थेचा दर्जा मिळाल्यामुळे यासाठी आवश्यक असलेली यंत्र, साधन सामग्री यांसह अत्यावश्यक बाबींची पूर्तता करणे, मराठवाडा विभागात कर्करोग निदान शिबिरांचे आयोजन करणे, प्राथमिक आरोग्य संस्थांच्या पातळीवर उक्त रुग्णालयाच्या माध्यमातून करून कर्करोगाचा प्रसार थांबविणे, कर्करोग निदानासाठी आवश्यक असलेल्या विविध चाचण्या एकत्रित एका छताखाली उक्त रुग्णालयात रुग्णांना सहज आणि मोफत उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे. शासन निर्णय दिनांक १५/२/२०१८ नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद येथील कनिष्ठ निवासी १, २ व ३ या संवर्गाच्या ७२ पदांसाठी विद्यावेतनाप्रमाणे वेतन अदा करण्यास मंजूरी देण्यात आल्यामुळे प्रोफेसर व तत्सम वरिष्ठ तज्ञ डॉक्टरांवरील कामाचा ताण कमी होणार आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १५/२/२०१८ नुसार कनिष्ठ निवासी डॉक्टरांचे वेतन विद्यावेतनाप्रमाणे अदा करण्यास मान्यता देण्यात आल्याने कनिष्ठ निवासींची पदे संस्थास्तरावरून भरणे शक्य होणार आहे. रिसर्च फेलो या पदाचे सेवाप्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे. कर्करोग रूग्णालयामध्ये भाभा ट्रान-२ हे यंत्र स्थापन करण्याची कार्यवाही सुरू असून सदर यंत्र कार्यान्वित झाल्यास रेडीएशन सारख्या उपचारासाठी लागणारा प्रतीक्षा कालावधी कमी होण्यास मदत होणार आहे. कर्करोग रूग्णालयात उपचारार्थ येणाऱ्या रूग्णांना अत्याधुनिक औषधे रूग्णालय प्रशासनामार्फत पुरविण्यात येतात व सदर औषधे गोरगरीब रूग्णांना मोफत उपलब्ध करून दिली जातात. केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून दुसरे नवीन लिनियर एक्सलेटर या यंत्राची खरेदी प्रक्रिया सुरू आहे.

(४) कर्करोग संस्थेचा दर्जा प्राप्त झालेल्या रूग्णालयास केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून यंत्र व साधन सामुग्री खरेदी आणि नवीन इमारत बांधकाम करण्यात येणार आहे. शासकीय कर्करोग रूग्णालयामार्फत मराठवाडा व महाराष्ट्राच्या विविध गावांमध्ये महा आरोग्य शिबिरात सहभाग नोंदवून कर्करोग निदान उपक्रम राबविले जातात. या उपक्रमादरम्यान प्राथमिक अवस्थेतील कर्करोग पिडीत रूग्णांना शासकीय कर्करोग रूग्णालयामार्फत आवश्यक असलेल्या शस्त्रक्रिया, किरणोपचार व केमोथेरेपीसारखे उपचार महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेमार्फत केले जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहर आणि जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूच्या वाढत्या प्रभावाबाबत

**(६९) * ३९३७६ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०९५ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर आणि जिल्ह्यात सन २०१६ पेक्षा सन २०१७ मध्ये स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढला असून सन २०१७ मध्ये राज्याच्या तुलनेत नाशिक जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यूमुळे सर्वाधिक ७७ जणांचा मृत्यू होवून डेंग्यू बाधितांची संख्या ही ९३० इतकी असल्याचे नाशिक महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडील अहवालावरून दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूचा वाढता प्रादुर्भाव रोखणेस स्थानिक आरोग्य यंत्रणा अपयशी ठरल्याने स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूग्रस्त रुग्णांची संख्या वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वाईन फ्ल्यूच्या निदानासाठी राज्यभरात केवळ सातच केंद्रे अस्तित्वात असल्याने आणि खाजगी डॉक्टरांकडून वेळीच स्वाईन फ्ल्यूची लक्षणे ओळखणे व त्यावरील तातडीच्या उपचारास तसेच आजाराच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेस विलंब होत असल्याने रुग्ण दगावण्याचे प्रमाण नाशिक जिल्ह्यात वाढल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक शहरात व जिल्ह्यात स्वाईन फ्ल्यूमुळे झालेले सर्वाधिक मृत्यू, स्वाईन फ्ल्यू व डेंग्यू बाधित रुग्णांची वाढती संख्या, स्वाईन फ्ल्यू निदानासाठी पुरेशी चाचणी केंद्रे नसणे याबाबींचा विचार करता सदरील आजाराच्या नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजनेचे निर्देश देणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

सन २०१६ च्या तुलनेत सन २०१७ मध्ये नाशिक (शहर व ग्रामिण) जिल्हयात स्वाईन फ्ल्यू रुग्ण व मृत्यूच्या संख्येत वाढ झाली हे खरे आहे. तथापि, डेंग्यू रुग्ण आणि मृत्यू संख्येत मात्र घट झालेली आहे.

सन २०१७ मध्ये नाशिक (शहर व ग्रामिण) जिल्हयात स्वाईन फ्ल्यू या आजारामुळे ७७ जणांचा मृत्यू झाला. याच काळात डेंग्यूमुळे नाशिक मनपा क्षेत्रात ९४९ तर उर्वरित जिल्हयात ९४ डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत.

(२) हे खरे नाही.

स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यू प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी स्थानिक आरोग्य यंत्रणा सर्व आवश्यक उपाययोजना राबवित असून राज्यस्तरावरुनही त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळत आहे. तथापि, वातावरणातील बदल अवेळी पडणारा पाऊस, विषाणूमध्ये होणारे बदल या व अशा अनेक कारणांमुळे विशिष्ट साथरोगाचे प्रमाण वाढताना दिसते.

(३) हे खरे नाही.

राज्यात सध्या स्वाईन फ्ल्यू निदानासाठी २४ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. संशयित स्वाईन फ्ल्यू रुग्णांना त्यांच्या लक्षणाच्या वर्गीकरणानुसार औषधोपचार सुरु करण्यात येतो. त्यामुळे प्रयोगशाळा निदानाअभावी रुग्णावरील उपचारास विलंब होत नाही. तथापि, राज्यात स्वाईन फ्ल्यू निदानासाठी अधिकाधिक स्वाईन फ्ल्यू प्रतिबंध आणि नियंत्रण यासंदर्भात शासकीय तसेच खाजगी डॉक्टरांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या असून या संदर्भातील सर्व मार्गदर्शक सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही.

स्वाईन फ्ल्यूमुळे झालेल्या प्रत्येक मृत्यूचे जिल्हा मनपा व विभागीय स्तरावर विश्लेषण करण्यात येत असून त्यानुसार कृती योजना ठरविण्यात येत आहे. स्वाईन फ्ल्यूमुळे होणारे मृत्यू हे गरोदर माता, मधुमेह आणि उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्ती अशा अतिजोखमीच्या व्यक्तींमध्ये अधिक प्रमाणात होतात हे लक्षात घेऊन आरोग्य कर्मचाऱ्यासह या अतिजोखमीच्या व्यक्तींना मोफत व ऐच्छिक इन्फूल्यंएझा लसीकरण करण्यात येत आहे.

तसेच साथरोगाच्या प्रभावि नियंत्रणासाठी राज्यस्तरावर महाराष्ट्र साथरोग व प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना करण्यात आली असून या समितीत एनआयव्ही पुणे, एनसीडीसी नवी दिल्ली, हाफकिन संशोधन संस्था मुंबई आणि इतर तज्ञ व्यक्तिंचा समावेश आहे. ही समिती वेळोवेळी साथरोग परिस्थितीचा आढावा घेऊन करावयाच्या उपायोजनांबाबत आरोग्य विभागास मार्गदर्शन करीत असते. याशिवाय स्वाईन फ्ल्यू आणि डेंग्यू प्रतिबंध व उचारासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना नियमितपणे करण्यात येतात.

- साथरोग रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
- इन्फूल्यंएझाकरीता पुरेशी स्क्रिनिंग सेंटर्स आणि विलगीकरण कक्ष कार्यरत.
- निदानासाठी प्रयोगशालेय सुविधा
- डेंग्यूसाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण आणि कार्यवाही.
- साथरोगासाठी पुरेसा औषधसाठा
- साथरोग संदर्भात शासकीय व खाजगी डॉक्टरांच्या कार्यशाळा
- एकात्मिक किटक व्यवस्थापन
- लोकसहभाग आणि आरोग्य शिक्षण.

(५) नाशिक जिल्हयातील साथरोग परिस्थितीचा जिल्हा तसेच विभागीय आणि राज्यस्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात आला असून साथरोग परिस्थितीनुसार सुयोग्य सूचना संबंधितांना देण्यात आल्या. या संदर्भात कोणाताही विलंब झालेला नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील वर्ग खोल्यांचा नवीन बांधकामाबाबत

**(७०) * ३९२५१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ३० जिल्हा परिषद शाळांमधील वर्ग खोल्या जीर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याने सदर शाळा खोल्या निर्लेखित करून नवीन खोल्या बांधण्याची स्थानिक

लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नवीन वर्ग खोल्या बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) येवला तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारतीच्या बांधकामाची पाहणी करुन निर्लेखनाबाबतचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कार्यरत महिला गाईडना वन संरक्षकाकडून मानसिक त्रास दिल्याबाबत

**(७१) * ३८९१८ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कार्यरत महिला गाईडना मुख्य वन संरक्षकाकडून मानसिक त्रास दिला जात असल्याची तक्रार ६ महिला गाईडनी रामनगर पोलीस स्टेशन येथे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही, तथापि, पुरुष व महिला गाईड यांचे काम वाटपाचे अनुषंगाने तक्रार केली आहे.

गाईडला काम देण्याची कार्यवाही आदिवासी ग्रामविकास पर्यटक मार्गदर्शक व वन्यजीव वनसंरक्षक समिती मार्फत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बोगस पॅथॉलॉजी लॅबबाबत

**(७२) * ४०४८७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य तपासण्या आणि चाचण्या करणाऱ्या पॅथॉलॉजी लॅबच्या नेमक्या संख्येची माहिती शासनाकडे नसल्याचे तसेच राज्यात बोगस पॅथॉलॉजी लॅब कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकरणी पॅथॉलॉजिस्ट संघटनाकडून वारंवार मागणी केल्यानंतर शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी सदर माहिती घेण्याबाबत महानगरपालिका व जिल्हाक्षेत्रात पत्र पाठवूनही अद्याप राज्यातील लॅबच्या संख्येबाबत माहिती उपलब्ध झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व अवैध लॅबमधून रुग्णांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या पॅथॉलॉजी लॅबविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

एका प्रकरणाच्या अनुषंगाने राज्यातील पॅथॉलॉजी लॅबची माहिती सर्व जिल्हाधिकारी व सर्व महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून मागविण्यात आली आहे.

तथापि, राज्यात बोगस पॅथॉलॉजी लॅब कार्यरत असल्याची बाब जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

शासनाने दिनांक १६/०९/२०१७ रोजी माहिती मागविल्यानंतर काही कार्यालयांकडून याबाबतची आकडेवारी प्राप्त झाली आहे व काही कार्यालयांकडून अद्यापी माहिती प्राप्त व्हावयाची आहे.
(३) अवैध लॅबविषयी शासनाकडे माहिती अथवा तक्रार प्राप्त झालेली नसल्यामुळे याबाबत चौकशी करुन कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला या संस्थेकरिता एमआरआय यंत्र खरेदी करण्याबाबत

**(७३) * ३८१६४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला या संस्थेकरिता १.५ टेस्ला एमआरआय हे यंत्र खरेदी करण्याकरिता मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त यंत्र खरेदी करण्याकरिता शासनस्तरावर किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.
(२) यासाठी श्री.सिध्दीविनायक गणपती मंदिर न्यासाकडून ५ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे.
(३) सदर यंत्रसामुग्री कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक पदनिर्मितीबाबत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वांझोळे स्टॉप (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) ते गावकरवाडी ग्रामदेवता मंदीरपर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेबाबत

**(७४) * ४०८०७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांझोळे स्टॉप (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) ते गावकरवाडी ग्रामदेवता मंदीरपर्यंतच्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेबाबतची विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी मा.रोजगार हमी योजना मंत्री यांचेकडे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आराखडयात समाविष्ट करण्यात आले नसून जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडूनही मंजूर झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्याचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आराखडयात समाविष्ट करणे तसेच खडीकरण व डांबरीकरण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) सदरचे काम ग्रामपंचायतीच्या/पंचायत समितीच्या आराखडयात नसल्याने त्याला मंजुरी देण्यात आलेली नाही.

(३) सदरहू काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१७-१८ च्या पुरक आराखडयात समाविष्ट करण्यात आले असून रस्त्याचा प्रस्ताव करणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बलात्कारपिडीत व ॲसिड हल्ल्यात जखमी महिलांसाठी असलेल्या मनोधैर्य योजनेचे निकष बदलण्याबाबत

**(७५) * ४०१९५ श्रीमती स्मिता वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८८९ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१३ मध्ये राज्यातील बलात्कार पिडीत व ॲसिड हल्ल्यात जखमी महिलांसाठी मनोधैर्य योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या आर्थिक निकषात बदल करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी शासनाने निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मनोधैर्य योजनेच्या सुधारणांमध्ये तर्कसंगती व विचाराचा अभाव असल्याचे स्पष्ट मत व्यक्त करत आदर्शवत योजना तयार करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या दोन न्यायमूर्तींचा समावेश असलेली त्रिसदस्यीय समिती न्यायालयाने स्थापन केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मा.मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १२/१०/२०१७ च्या आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाच्या दोन न्यायमूर्ती, राज्याचे महाधिवक्ता व सचिव (महिला व बालविकास) यांचा समावेश असलेली समिती स्थापन केली आहे.

(४) व (५) होय.

सदर समितीने सादर केलेल्या Modal Scheme नुसार राज्यात नवीन मनोधैर्य योजना दिनांक ३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे.

सदर नवीन मनोधैर्य योजनेंतर्गत पीडितांच्या अर्थसहाय्याच्या मागणीचे अर्ज स्विकारण्यापासून ते अर्थसहाय्य मंजूरीपर्यंतचे पूर्ण अधिकार हे संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व राज्य विधी सेवा प्राधिकरण यांना देण्यात आले आहेत.

-----------------

## मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना काम व हजेरीपत्रक मिळण्याबाबत

**(७६) * ४०४३९ श्री.रामहरी रुपनवर** : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (ता.जि.सोलापूर) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासाठी पंचायत समितीकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने मागणी केलेल्या मजुराला काम व हजेरीपत्रक मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेची कामे मोठया प्रमाणात सुरु असून ती कामे माहे मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असले तरी प्रत्यक्षात या कामावरील नियोजनासाठी असलेल्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांची बदली केल्याने सांगोला येथे या योजनेचे काम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील सहाय्यक कार्यक्रम अधिकारी यांना सांगोला व मंगळवेढयांचा पदभार दिला असल्याने दोन्ही तालुक्यात तीन-तीन दिवस काम केले जात आहे तसेच ऑपरेटर नसल्यामुळे हजेरीपत्रक निघत नसल्याने नवीन जॉब कार्डदेखील मिळत नाही त्यामुळे रोजगार सेवकांचे मानधनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

मंगळवेढा पंचायत समितीकडे माहे डिसेंबर, २०१७ व जानेवारी, २०१८ मध्ये ५६५ मजुरांनी कामाची मागणी नोंदविलेली होती. त्यानुसार त्या मजुरांना काम उपलब्ध करुन देण्यात आले असून, पंचायत समितीकडून १३७ हजेरीपत्रके निर्गमित करण्यात आलेली आहेत.

(२) प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून केवळ अकुशल मजुरी दिली जाते.

प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत अकुशल मजुरांची कामाची मागणी आल्यास त्याप्रमाणे हजेरीपत्रक निर्गमित करण्यात येतात. हजेरीपत्रक काढणे, भरणे इत्यादी कामे लिपीक कम डेटा एन्ट्री ऑपरेटरचे आहे. त्यानुसार सांगोला तालुक्यामध्ये दोन डाटा एन्ट्री ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**<br>**प्रधान सचिव,**<br>**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.